❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : ३०४ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



युती टिकवायची की तोडायची भाजपने ठरवावं

एकनाथ शिंदेंच्या नेतृत्त्वात निवडणुका झाल्या, आता त्यांनीच मुख्यमंत्री व्हावं : अब्दुल सत्तार

■ नवी दिल्ली (दै. संध्या)



विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाचा निकाल लागल्यावर आता महायुतीतच वादाचा धुरळा उडाल्याचं दिसतंय. शिवसेना आणि भाजप नेते एकमेकांवर खुलेआम आगपाखड करत आहेत. मात्र गेल्या काही दिवसांपासून एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्रिपदावर विराजमान करण्याच्या शिवसेना नेत्यांच्या मागणीनं या वादात पुन्हा उचल खाल्ल्याचं दिसतंय. शिवसेना नेते अब्दुल सत्तार आणि रवींद्र धंगेकर यांनी थेट मुख्यमंत्रिपदावर वक्तव्य केलं आहे. तसेच महायुती टिकवायची की नाही हे आता भाजपच्या हातात असल्याचं अब्दुल सत्तार म्हणाले.

2024 च्या विधानसभा निवडणुका महायुती एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात लढल्यानं मुख्यमंत्रिपदावर शिंदेंचाच अधिकार असल्याचं अब्दुल सत्तारांनी म्हटलं आहे. तर शिंदेंच्या काळात सरकार आणि जनतेतला समन्वय चांगला होता. त्यामुळे शिंदेंच पुन्हा मुख्यमंत्रिपदावर विराजमान व्हावेत, असं धंगेकरांनी म्हटलं आहे. त्यामुळे निवडणूक निकालानंतर निर्माण झालेल्या वादाचा मुख्य उद्देश हा मुख्यमंत्रिपदाबाबत असल्याचं लपून राहिलेलं नाही. छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी राष्ट्रवादीच्या सतीश चव्हाण यांना आम्ही पाठिंबा देणार नाही असं जाहीर केलं. आमच्या नेत्यांनी तसं जाहीर केल्यानंतर आम्हीदेखील सतीश चव्हाण यांना विरोध केला. मी लपून-छपून काही केलं नाही, जे काही केलं ते खुलं केलं. महायुतीमध्ये कोणताही मिठाचा खडा पडला नाही. तसं काही असेल तर मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री हे एकत्र बसतील आणि चर्चा करून मार्ग काढतील. त्यांनी आम्हाला काही प्रश्न विचारले तर आम्ही त्याचे उत्तर देऊ. आजकाल देशामध्ये जी परिस्थिती निर्माण झाली आहे त्यामध्ये अब्दुल सत्तार नावाला विरोध केला जात आहे. त्यामुळे आमच्यासारख्या कार्यकर्त्याला अनेक संकटातून वाट निर्माण करावी लागते, असंही अब्दुल सत्तार म्हणाले. एकनाथ शिंदे दिल्लीला जातात आणि पंतप्रधान मोदी, अमित शाहांना भेटतात. त्यावेळी शिंदे पुन्हा मुख्यमंत्री होणार का अशी चर्चा सुरू होते. यावेळी आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना त्याचा आनंद वाटतो. त्यामुळे भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांमध्ये मात्र काहीशी नाराजी निर्माण होते. देशात जशी भाजपची सत्ता आहे तशी महाराष्ट्रातही आहे. 132 आमदार त्यांच्या पक्षाचे आहेत, मात्र बहुमतासाठी 145 आमदार लागतात. त्यामुळे आता महायुती टिकवायची की नाही हे सर्व भाजपच्या हातात आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांच्याच नेतृत्वाखाली विधानसभेच्या निवडणुका महायुतीने जिंकल्या. त्यामुळे तेच मुख्यमंत्री व्हावेत ही शिवसेनेची भावना आहे, असं अब्दुल सत्तार म्हणाले.

बाहेरच्या लोकांकडून ठाणेकरांना वारंवार त्रास : एकनाथ शिंदे

शिवसेनेचे मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषद निवडणूक निकाल आणि मीनाक्षी शिंदे यांच्या राजीनाम्यावर भाष्य केलं. भाजप प्रवक्त्यांकडून शिवसेनेवर विधानपरिषदेत युतीधर्म पाळला गेला नसल्यासंदर्भात आरोप करण्यात आले होते, त्याला उत्तर देताना एकनाथ शिंदे यांनी शिवसेना नेहमी युतीधर्म पाळते, असं म्हटलं. तर, मीनाक्षी शिंदे यांनी राजीनामा माझ्याकडे पाठवला असून पूर्णेकर प्रकरणी सुरु असलेलं राजकारण दुर्दैवी असल्याचं एकनाथ शिंदे म्हणाले. शिवसेनेनं नेहमी युतीधर्म पाळला आहे. शिवसेना भाजप युती चार ठिकाणी होती, पुणे शिक्षक मतदारसंघात शिवसेनेनं पुरस्कृत उमेदवार आणि भाजपचा उमेदवार अशी मैत्रीपूर्ण लढत होती. शिवसेनेनं नेहमी युतीधर्म पाळलेला आहे आणि युतीधर्म पाळावा अशी भूमिका शिवसेनेची राहिलेली आहे. मीनाक्षीताई शिंदे, महिला आघाडीच्या जिल्हा संघटक यांनी माझ्याकडे त्यांच्या पदाचा राजीनामा पाठवलेला आहे. त्यामध्ये त्यांनी उल्लेख केला आहे, जी काही घटना झालीय ती दुर्दैवी आहे. पूर्णेकरांची हत्या दुर्दैवी आणि दु:खद आहे. परंतु, इतर राजकीय पक्ष राजकारण करत आहेत ते त्याहून दुर्दैवी आहे. मग ही भावना ठेवून, त्यांचं नाव वारंवार त्या घटनेशी जोडलं जातंय. त्यामुळं पक्षाला त्रास होतोय, म्हणून त्यांनी भावना व्यक्त करुन पदाचा राजीनामा दिलेला आहे, असं एकनाथ शिंदेंनी म्हटलं. एकनाथ शिंदे म्हणाले की प्रदीप पूर्णेकर हत्या प्रकरणी कायदेशीर बाबी सुरु आहेत, पोलिसांनी तपास सुरु असल्याचं सांगितलं आहे. मी पहिल्याच दिवशी पोलीस आयुक्तांना फोन करुन या घटनेची गंभीर दखल घेतली. हा तपास निष्पक्षपणे झाला पाहिजे हे सांगितलं आहे. जलदगतीनं आरोपी पकडले गेलेले आहेत, शस्त्र पकडलेली आहेत.

थोडक्यात...

थेट मुख्य अभियंत्यांच्या कार्यालयातच धाड

पिंपरी-चिंचवड : दैनिक संध्या

पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुरुवारी अत्यंत मोठी आणि धडक कारवाई करत थेट वर्ग-१ च्या सर्वोच्च तांत्रिक पदावरील अधिकाऱ्याला लाचखोरीच्या जाळ्यात पकडले आहे. महापालिकेचे मुख्य अभियंता (क्रमांक २) प्रमोद सुधाकर ओंबासे यांना एका ठेकेदाराकडून १९ हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी पुणे एसीबीच्या पथकाने थेट महापालिकेच्या मुख्य इमारतीतील त्यांच्या कार्यालयातून ताब्यात घेतले आहे. महापालिकेतील इतक्या बड्या अधिकाऱ्यावर थेट दालनातच एसीबीने धाड टाकल्याने महापालिकेच्या प्रशासकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. एसीबीच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एका ठेकेदाराला महापालिकेचे विकासकाम (पाईपलाईन व इतर कामे) मिळवून देण्यासाठी आणि त्यासंबंधीची फाईल पुढे सरकवण्यासाठी मुख्य अभियंता प्रमोद ओंबासे यांनी १९ हजार रुपयांच्या लाचेची उघड मागणी केली होती.

भरपाई करुन देण्याची जबाबदारी बँकेची!

पिंपरी-चिंचवड : दैनिक संध्या

डिजिटल फसवणुकीला बळी पडलेल्या खातेदारांचे संरक्षण करणे ही बँकांची आणि वित्तीय संस्थांची मूलभूत जबाबदारी आहे. बँकांच्या निष्काळजीपणामुळे फसवणूक झाल्यास पीडितांच्या संपूर्ण आर्थिक नुकसानाची भरपाई संबंधित बँकांनीच करावी, अशी महत्त्वपूर्ण टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी नोंदवली. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने यासंदर्भातील एका जनहित याचिकेवर सुनावणी करताना बँकांना जबाबदार धरण्याचे आणि त्यांच्यावर कारवाई करण्याचे स्पष्ट संकेत दिले. डिजिटल अरेस्टसारख्या गंभीर सायबर गुन्ह्यांमध्ये बँकेच्या सतर्कतेचा आणि पडताळणीचा अभाव दिसून आल्यास ग्राहकाचे गेलेले पैसे बँकेने परत दिलेच पाहिजेत, असे नमूद करत सरन्यायाधीशांनी, अशा प्रकरणांमध्ये बँकांवर खटलाही चालवला जावा, असा थेट इशारा दिला. सुनावणीदरम्यान सरन्यायाधीशांनी बँकांच्या संशयास्पद व्यवहार ओळखण्याच्या यंत्रणेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. खात्यातून अचानक होणाऱ्या असामान्य व्यवहारांवर तातडीने बंदी घालणे, संशयास्पद हालचालींची स्वयंचलित माहिती देणे आणि व्यवहारांची प्रत्यक्ष पडताळणी करणे अनिवार्य असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले.

फटाक्यांवर पूर्ण बंदी घालण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

विराट कोहलीसारख्या सेलिब्रिटींची मदत घेण्याचा सल्ला

■ मुंबई (दै. संध्या)



दिवाळीच्या सणाच्या पार्श्वभूमीवर दिल्ली-एनसीआर मध्ये फटाक्यांवर पूर्णपणे बंदी घालण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत महत्त्वपूर्ण आणि मोठी टिप्पणी केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, न्यायालय फटाक्यांवर पूर्ण बंदी घालण्याच्या बाजूने नाही, तर याप्रकरणी एक संतुलित आदेश पारित केला जाईल. सणांच्या काळात लोकांच्या उत्साहावर किंवा आनंदावर गदा आणण्याची न्यायालयाची मुळीच इच्छा नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने फटाक्यांचे नियम मोडणाऱ्यांवर आणि अवैध विक्री करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. फटाके आणि प्रदूषणाबाबत लोकांमध्ये जागरूकता पसरवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने एक अनोखा सल्ला दिला आहे. "नवीन पिढी आधीपासूनच फटाके आणि प्रदूषणाबाबत बऱ्यापैकी जागरूक आहे. मात्र, फटाक्यांमुळे होणाऱ्या प्रदूषणाविषयी जनजागृती करण्यासाठी विराट कोहलीसारख्या लोकप्रिय सेलिब्रिटींचा वापर केला गेला पाहिजे," अशी महत्त्वपूर्ण टिप्पणी न्यायालयाने केली आहे. दरवर्षी या विषयावर आदेश जारी करावे लागण्यावर भाष्य करताना न्यायालयाने म्हटले की, हा विषय आता न्यायालयासाठी केवळ एक शैक्षणिक मुद्दा बनला आहे. न्यायालयाच्या आदेशांचे पालन कमी आणि उल्लंघनच जास्त होते, असे न्यायाधीशांनी मान्य केले. केवळ बंदी घालून या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघू शकत नाही, त्यामुळे केवळ कागदी आदेशांपेक्षा कठोर अंमलबजावणी आवश्यक असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले.

निवृत्तीला फक्त दोनच दिवस बाकी, पण पैशांचा मोह नडला

८० हजारांची लाच मागितली, मालेगाव महापालिका आयुक्तांवर कारवाई

■ मुंबई (दै. संध्या)



निवृत्तीला अवघे दोन दिवस बाकी असताना मालेगाव महापालिका आयुक्त रवींद्र जाधव यांना पैशांचा हव्यास नडला आहे. आयुक्त रवींद्र जाधव हे लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात अडकले आहेत. 80 हजार रुपयांची लाच मागितल्या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागानं ही कारवाई केली आहे. 31 ऑक्टोबरला ते सेवानिवृत्त होणार होते. दरम्यान, मालेगाव महापालिका आयुक्त रवींद्र जाधव यांनी लाच मागितल्याच्या घटनेवरुन कारवाई केल्यानंतर खळबळ उडाली आहे.

मालेगाव महापालिकेचे आयुक्त रवींद्र जाधव हे 31 ऑक्टोबरला शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होणार असतानाच एका ठेकेदाराची बिले काढून देण्यासाठी चार टक्क्यांची 80 हजार रुपयांची लाच मागितल्या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकले आहेत. केवळ दोन दिवस सेवानिवृत्तीला असतांना पैशाचा हव्यास नडला आणि कारवाईला सामोरे जावे लागले. यापूर्वी धुळे येथील एक कारवाईचा ससेमीरा पाठीशी असताना दुसऱ्यांदा पुन्हा लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात अडकल्याने मालेगावच्या प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या कारवाईनंतर त्यांच्या निवासस्थानी ACB च्या अधिकाऱ्यांनी झाडाझडती घेतली. आयुक्त रवींद्र जाधव यांचेसह अजून दोघांना एसीबीने ताब्यात घेतले आहे..या तपासातून काय समोर येणार, याकडे लक्ष लागलं आहे.

रवींद्र शेषराव जाधव हे 16 डिसेंबर 2023 पासून मालेगाव महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक म्हणून कार्यरत आहेत.

धुळे महापालिकेचे प्रभारी अतिरिक्त आयुक्त पद असतांना उपायुक्त रवींद्र जाधव यांना (14 जानेवारी 2019) त्यांच्या निवासस्थानी उपशिक्षकाकडून पंधरा हजारांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले होते. रवींद्र जाधव यांची मालेगावी महापालिकेवर नियुक्ती झाल्यानंतर त्यांच्या नियुक्तीला मालेगावकर विधायक संघर्ष समितीने विरोध करत आंदोलन केले. भ्रष्ट अधिकारी महापालिकेवर बसवू नका अशी त्यांची मागणी होती. मालेगावात त्यांच्या नियुक्तीला व कार्यपद्धतीला काही स्थानिक आघाड्यांनी व संघटनांनी विरोध दर्शवला होता. रवींद्र जाधव हे अवघ्या दोन दिवसानंतर म्हणजेच 31 ऑक्टोबर 2026 ला प्रशासकीय सेवा संपवून सेवानिवृत्त होणार होते.



चकली, चिवडा फरसाण...तुकाराम मुंढेंचं नवं टार्गेट ठरलं, FDA ॲक्शन मोडमध्ये!

■ मुंबई (दै. संध्या)

एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी अन्नपदार्थातील भेसळ रोखण्यासाठी आतापर्यंत शेकडो कारवाया केल्या आहेत. सध्या सणासुदीचा काळ आहे. मिटाई, फरसाण अशा खाद्यपदार्थांची या काळात मोठी विक्री होते. हीच बाब लक्षात घेऊन आता तुकाराम मुंढे यांनी नवी मोहीम उघडली आहे. थेट पत्रकार परिषद घेऊन तुकाराम मुंढे यांनी याबाबत माहिती दिलीय. दिवाळीच्या काळात एफडीएकडून नेमकं काय काय केलं जाणार? याची माहिती त्यांनी दिलीय. तुकाराम मुंढे यांनी आज पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी आतापर्यंत काय काय कारवाई करण्यात आली, याची सविस्तर माहिती दिली. तसेच सध्याच्या सणासुदीच्या काळात एफडीए काय कारवाई करणार, याबाबतही त्यांनी सांगितले. दिवाळी जवळ आली आहे. त्यामुळे आता आम्ही कारवाईचा वेग वाढवणार आहोत. दिवाळीच्या काळात फराळ, मिठाई, चकली, चिवडा आणि इतर वस्तूंची चौकशी केली जाणार आहे. दिवाळी संपेपर्यंत ही कारवाई सुरू राहणार आहे, अशी माहिती तुकाराम मुंढे यांनी दिली. सणासुदीच्या काळात आजारांच प्रमाण वाढतं. सणासुदीच्या काळात तारीख निघून गेलेले पदार्थ, दर्जाहीन पदार्थ यांची विक्री केली जाते. त्यामुळेही आजार वाढतात. दिवाळी सण जवळ आल्याने मसाले निर्मिती करणाऱ्या 1057 मसाला आस्थापनांवर कारवाई करून चौकशी करण्यात आली आहे. यात 94 आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आलेले आहेत. 11963 क्विंटल मसाले व मसालेजन्य पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. जप्त करण्यात आलेल्या मसाल्यांची किंमत 19.69 कोटी रुपये आहे. गोडाऊन आणि कारखान्यांमध्ये ही कारवाई करण्यात आलीय, असे तुकाराम मुंढे यांनी सांगितले आहे.

दुकानदारांनाही घ्यावी लागणार काळजी?

दरम्यान तुकाराम मुंढे यांनी दिवाळसणात एफडीए आपली कारवाई वाढवणार आहे, असे सांगितल्याने व्यापारी, दुकानदारांना काळजी घ्यावी लागणार आहे. या निर्णयाचे स्वागत केले जातेय. त्यामुळे आता एफडीएच्या कारवाईत कोण लक्ष्य होणार, भविष्यात काय होणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



संपादकीय

स्वबळाच्या धोरणाला ब्रेक?

पदवीधर,आणि शिक्षक मतदार संघाच्या पाच जागांसाठी शेवटच्या क्षणापर्यंत झालेल्या अटीतटीच्या लढाईत महाविकास आघाडीने तीन जागा जिंकत सत्ताधारी महायुतीला धक्का दिलेला आहे. पुणे, आणि मराठवाड्यातील छत्रपती संभाजी नगर मधील विद्यमान आमदार महायुतीकडे गेल्या वरही या दोन्ही जागा राष्ट्रवादीने कायम राखत सत्ताधाऱ्यांना महाविकास आघाडीची ताकद दाखवून दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणविसांच्या नागपुरात पदवीधर च्या जागेवर काँग्रेसने बाजी मारली. या ठिकाणी भाजपवर पराभवाची नामुष्की ओढवली. पुणे, आणि अमरावती, शिक्षक मतदार संघात महायुतीचे अधिकृत, आणि बंडखोर, मध्ये झालेल्या चुरशीच्या लढाईत भारतीय जनता पक्ष, आणि शिंदे गटाचे उमेदवार जिंकले. महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे, छत्रपती संभाजी नगर, नागपूर पदवीधर, आणि पुणे, अमरावती, शिक्षक मतदार संघाच्या पाच जागांसाठी झालेल्या निवडणुकीत महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असा थेट सामना झाला. काही मतदारसंघात मैत्रीपूर्ण लढती होत असल्याने कोणाला धक्का बसणार? याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते. मंगळवारी आठ वाजल्यापासून या निवडणुकीच्या मतमोजणीच्या प्रक्रियेला सुरुवात झाली, व या पाचही ठिकाणी आवश्यक असलेल्या पहिल्या पसंतीच्या मतांचा कोटा कोणत्याही उमेदवाराला पूर्ण करता आला नाही. त्यामुळे दुसऱ्या पसंतीच्या मतांची मोजणी करावी लागल्याने ही मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होऊन विजयी उमेदवाराच्या घोषणेसाठी २४ तासाहून अधिक वेळेची वाट पहावी लागली. पुणे पदवीधर मतदारसंघातील निकालाने महायुतीच्या निवडणूक रणनीती बरोबरच महायुतीतील समन्वयावरही प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. सुरुवातीला उमेदवारी निश्चित करण्यापासून अर्ज भरणे, आणि प्रचाराचे नियोजन करण्यापर्यंत भाजपने महायुतीतील त्यांच्या मित्र पक्षांना दूर ठेवण्याची नाराजी होती.अखेरच्या टप्प्यात झालेल्या बैठकांमध्येही नाराजी उघड झाली. यामुळे महायुतीचे नेते एकत्र दिसत असले तरी प्रत्यक्ष निवडणुकीत कार्यकर्त्यांची मने दुभंगली गेली होती, भाजपचे "एकला चलो रे" हे त्यांच्यावरच उलटल्याची चर्चा निवडणुकीच्या निकालानंतर दबक्या आवाजात सुरू झालेली आहे. पुणे पदवीधर विधानपरिषदेच्या या जागेवर सुरुवातीपासून ज्येष्ठ समाजवादी नेते कै.ग. प्र.प्रधान.हे निवडून येत होते. प्रधान सरांनी जवळजवळ २७ वर्षाहून अधिक कालावधीपर्यंत या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. दरम्यानच्या काळात ते काही काळ विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते होते. त्यानंतर भारतीय जनता पक्षाचे प्रकाश जावडेकर हे दोन वेळा, शरद पाटील, एक वेळा त्यानंतर सध्याचे मंत्री चंद्रकांत पाटील हे दोन वेळा निवडून आले,मागील सहा वर्षापूर्वीच्या निवडणुकीत राष्ट्रवादी पक्षाचे अरुण लाड हे विजयी झाले होते,अरूण लाड यांचे चिरंजीवांनी(शरद लाड)वर्षापूर्वी भारतीय जनता पक्षात प्रवेश केलेला होता, त्यांना या मतदारसंघाची उमेदवारी देण्याचे आश्वासन देण्यात आले असल्याची चर्चा होती, प्रत्यक्षात त्यांना उमेदवारी न देता डॉ. स्मिता जाधव यांना उमेदवारी देण्यात आली, पदवीधरची ही जागा यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसकडे होती, ती भाजपकडे गेल्याने राष्ट्रवादी कार्यकर्त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये खंत होती, समन्वयाच्या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली होती, जेष्ठ मंत्री चंद्रकांत पाटील यांनी त्यावेळी स्वतःच्या दोन निवडणुकीचा दाखला देऊन दोन्ही काँग्रेस एकत्र असतानाही आपण निवडून आलेलो आहोत, व पुणे विधान परिषदेची जागा परंपरागत जनसंघ, भारतीय जनता पक्षाची असल्याचे त्यांनी अभिमानाने सांगितले होते. या विधानाचा अर्थ राष्ट्रवादीच्या मताची व निवडणुकीत सहकार्याची भारतीय जनता पक्षाला आवश्यकता नाही, असा संदेश सर्वत्र गेला. भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी डॉ. स्मिता जाधव यांचा उमेदवारी अर्ज भरल्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या नगरसेवकांची बैठक बोलावली होती, या बैठकीला सुमारे शंभरहून अधिक नगरसेवक अनुपस्थितीत राहिले, त्यांना कारणे दाखवा नोटिसा काढल्या होत्या. त्यामुळे भाजपला जेवणात पहिल्याच घासाला खडा लागावा!..अशी स्थिती महायुतीतील मोठ्या भावाची झाली, डॉ. स्मिता जाधव यांच्या उमेदवारीची आधी घोषणा झाली, त्यानंतर त्यांनी पक्षात प्रवेश केला, त्यामुळे पक्षातील निष्ठावंताचा मूक, व थंड प्रतिसाद, आणि स्थानिक नेतृत्वाचा दाखवण्यापुरता सहभाग, या बाबीही चर्चेत राहिल्या, भारतीय जनता पक्षाकडे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद,आणि संघ परिवाराची व पक्षाची व मोठमोठ्या शिक्षण संस्थांची, व बँकांची, मोठी यंत्रणा असतानाही डॉ. स्मिता जाधव यांच्या प्रचारासाठी अपेक्षित प्रमाणात ही मंडळी सक्रिय झाली का?... हा प्रश्न आता विचारला जात आहे. याउलट शिक्षक मतदारसंघात कौस्तुभ गावडे यांच्यासाठी हीच यंत्रणा अधिक सक्रिय झाल्याचे चित्र दिसून आले, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या हर्षदा देशमुख जाधव यांनी गेल्या वर्षभरापासून मतदार नोंदणी, आणि जनसंपर्कावर मोठा भर दिला होता, पुण्याचे निवृत्त जिल्हाधिकारी व निवृत्त विभागीय आयुक्त प्रभाकर देशमुख यांच्या हर्षदा या कन्या, असल्याने देशमुख यांचा पुणे विभागातील सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर,आणि पुणे शहर व जिल्ह्यात मोठा संपर्क असल्याने त्याचाही थोडाफार फायदा शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराला झाला. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी प्रत्यक्ष मोठ्या सभा घेतल्या नसल्या तरी पक्षाची स्थानिक, आणि संस्थात्मक यंत्रणा, सक्रियपणे हर्षदा देशमुख यांच्या पाठीशी राहिल्याचे दिसून आले, कोल्हापूर,आणि सांगली जिल्ह्यात शरद लाड व भैय्या माने यांनी पदवीधर मतदार नोंदणीसाठी विशेष प्रयत्न केले होते, हे दोघेही भाजपसोबत असल्याने मतदार नोंदणीचा फायदा भाजपला होईल अशी अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्ष मतदानात त्याचा लाभ भाजपा ऐवजी शरद पवार गटाच्या उमेदवाराला झाला. अशी जोरदार चर्चा आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुण्यातील एमपीएससी स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांचे दहा दिवसांहून अधिक दिवस चाललेले आंदोलन, कोल्हापूरच्या गोकुळ दूध संघाचा निकाल, आणि भीमाशंकर अभयारण्य परिसरातील प्रस्तावित वृक्षतोडीचा मुद्दा, विशेष चर्चेत होता, याशिवाय मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी दसरा मेळाव्यानंतर जाहीर केलेली ध्वनि चित्रफित यामुळे ही पुणे, आणि छत्रपती संभाजी नगर मध्ये महायुतीला मोठा फटका बसला असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या भीमाशंकर अभयारण्य परिसरातील प्रस्तावित वृक्षतोडीचा मुद्दा सध्या सर्वत्र गाजत आहे. या प्रश्नामुळे भाजपची सर्वत्र राजकीय कोंडी झाल्याची टीका विरोधकाकडून झाली, डॉ. स्मिता जाधव यांना उमेदवारी देताना काँग्रेस नेते सतेज पाटील यांच्या त्या भाची आहेत. या नातेसंबधाचा, व राजकीय समीकरणाचाही विचार झाल्याची चर्चा होती. प्रत्यक्षात मात्र या रणनीतीचा प्रत्यक्ष निकालावर परिणाम दिसून आलेला दिसत नाही, निवडणुकीत पैशाच्या वापरा बाबतही आरोप झाले व त्याची खुलेआम चर्चा झाली व उघडपणे होत होती. एका मतासाठी मोजली गेलेली किंमत जाहीरपणे चर्चेत होती, एवढे करूनही भाजपचा झालेला पराभव हा भाजपनेच करून घेतल्याची त्याची बौध्दिक आत्मचिंतन पक्षात सुरू आहे. असे पराभवानंतर सांगण्यात आले असल्याची दबक्या आवाजात चर्चा चालू होती, शिक्षक मतदार संघात भाजपने कोल्हापूरच्या स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची संबंधित कौस्तुभ गावडे यांना उमेदवारी दिली, शिंदे गटाकडून मंगेश चिवटे यांचा उमेदवार अर्ज मोठ्या शक्ती प्रदर्शनात दाखल करण्यात आला. मात्र पुढे त्यांची उमेदवारी कायम राहिली नाही, त्यानंतर उद्योग मंत्री उदय सामंत यांचे माजी ओएसडी सचिन सानप या अपक्ष उमेदवाराला शिंदे गटाने पाठिंबा दिला, या घडामोडी मागे महायुतीतील राजकीय गणिते असल्याची जोरदार चर्चा आहे, मुख्यमंत्री फडणवीस आणि शिंदे यांनी सोलापूरचे दत्ता सावंत यांची मते खाण्यासाठी आपापसात ठरवून सानप यांना पाठिंबा द्यायला लावला, याची चर्चा आता पुन्हा उघडपणे सुरू झालेली आहे,शिक्षक मतदार हा पदवीधर मतदार असल्याने या दोन्ही मतदारसंघातील काही मतदार समान आहेत, त्यामुळे शिक्षक मतदार संघातील उमेदवारी आणि पाठिंब्याच्या निर्णयाचा पदवीधर मतदारसंघातील समीकरणावर विपरीत परिणाम झाला. मात्र सानप यांना पाठिंबा देण्यामागे पदवीधर मधील मत विभाजनाचा हेतू होता असे हळूहळू स्पष्ट होऊ लागलेले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुण्यात येऊन बैठकांचा धडाका लावला, आणि भाजपची यंत्रणा सक्रीय केली, तरीही पदवीधरचे निवडणूकीमध्ये मित्र पक्षांचा अपेक्षित सहभाग, आणि कार्यकर्त्यांची एकजूट हरवली होती, भाजपच्या या ताकदीला पश्चिम महाराष्ट्रातील सक्षम पदवीधरांनी ब्रेक लावला, त्यांच्या मित्र पक्षांनी भाजपचा दबाव झुगारून भाजपच्या "एकला चलो" व आगामी सन २०२९ च्या लोकसभा, व विधानसभा निवडणुका स्वबळावर लढवण्याच्या धोरणाला व तयारीला विधान परिषदेतील पुणे, छत्रपती संभाजीनगर, आणि नागपूर येथील अनपेक्षित पराभवाने मिळालेले हे समर्पक उत्तर आहे.

तरुणाच्या पोटात धारदार हत्यार खुपसून खुनाचा प्रयत्न

तिघांना अटक : वालचंदनगर पोलिसांची कामगिरी; इंदापूर तालुक्यातील कळस येथील घटनेचा उलगडा

■ वालचंदनगर (दै. संध्या)



किरकोळ वादातून एका तरुणाच्या पोटात धारदार हत्यार खुपसून त्याचा खून करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी वालचंदनगर पोलिसांनी तिघा आरोपींना अटक केली आहे. सुरज यंकप्पा पवार याच्यावर धारदार हत्याराने वार करून गंभीर जखमी केल्याची घटना २३ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास मौजे कळस, तालुका इंदापूर येथे घडली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कळस गावच्या हद्दीतील एका कंपनीच्या कामगार वसाहतीमधील पाण्याच्या टाकीजवळ फिर्यादी व त्यांचे काही सहकारी असताना आरोपी मल्लेशी (मल्लू) भोसले ऊर्फ रमेश शंकर चव्हाण याच्याशी सुरज पवार याचा किरकोळ वाद झाला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. त्यावेळी आरोपीने सुरज पवार याच्या पोटात धारदार हत्यार खुपसून त्याला गंभीर जखमी केले. त्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. जखमी सुरज पवार याला तातडीने उपचारासाठी बारामती येथील वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच वालचंदनगर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी गोपाळ पवार, पोलीस निरीक्षक, यांनी घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनाही घटनेची माहिती देण्यात आली. तपासादरम्यान पोलिसांनी आरोपींचा शोध घेण्यासाठी वेगवेगळ्या भागांत पथके रवाना केली. तपासात मल्लेशी भोसले ऊर्फ रमेश शंकर चव्हाण (राहणार यवत, तालुका दौंड, जिल्हा पुणे), अभिषेक ऊर्फ अक्षय मल्लू भोसले (वय ३० वर्षे, राहणार यवत, तालुका दौंड, जिल्हा पुणे) आणि रामचंद्र मल्लू भोसले (वय ३० वर्षे, राहणार चिंचवड, पुणे) यांची नावे निष्पन्न झाली. पोलिसांनी तिघांना ताब्यात घेऊन अटक केली आहे.

या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सतीश चव्हाण करीत आहेत. ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, बारामती विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी चेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत वालचंदनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गोपाळ पवार, पोलीस उपनिरीक्षक सचिन चव्हाण, पोलीस हवालदार गणेश बोरकर, किर्तीलाल गायाकवाड, गणेश काटकर, विकास निर्मळ, किसन बेलदार, अमोल गायाकवाड आणि महेश पवार, तसेच पोलीस अंमलदार अभिजित कळसकर, विक्रमसिंह जाधव आणि गणेश वानकर यांनी सहभाग घेतला. किरकोळ वादातून घडलेल्या या गंभीर घटनेचा तपास करून तिन्ही आरोपींना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास वालचंदनगर पोलीस करीत आहेत.

हातभट्टीची दारू विक्री करणाऱ्या दोन महिलांना अटक

■ वडगाव निंबाळकर (दै. संध्या)

येरवडा कारागृहात रवानगी



वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन हद्दीत हातभट्टीची दारू विक्री करणाऱ्या कोमल प्रमोद नवले व जयश्री प्रकाश नवले,दोन्ही रा.निंबुत,ता.बारामती, जि.पुणे यांच्याविरुद्ध पोलिसांनी कारवाई केली आहे.सदर दोन्ही महिलांना अटक करून येरवडा कारागृहात पाठविण्यात आले आहे. याप्रकरणी वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर 231/2026 भारतीय न्याय संहिता कलम १२३ व महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५(ई) अन्वये कारवाई करण्यात आली आहे.सदर कारवाई ही 26/10/2026 रोजी करण्यात आली. सदर कारवाई सहायक पोलीस निरीक्षक जीवन मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अंमलदार ग्रेड पोलीस उपनिरीक्षक दीपक वारुळे,पोलीस शिपाई निलेश जाधव,नागनाथ परगे,आरती तोडेकर व विकास येटाळे यांनी केली.

वैद्यकीय महाविद्यालयात 'व्हाईट कोट' समारंभ उत्साहात संपन्न

■ बारामती (दै. संध्या)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, बारामती येथे प्रथम वर्षाच्या वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी 'व्हाईट कोट'समारंभउत्साहातसंपन्नझाला.वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवासाची सुरुवात करणाऱ्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय व्यवसायातील जबाबदाऱ्या, नैतिक मूल्ये, रुग्णसेवेचे महत्त्व आणि मानवतावादी दृष्टिकोन यांची जाणीव करून देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. अंजली पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, वैद्यकीय शिक्षणात केवळ शैक्षणिक ज्ञान व तांत्रिक कौशल्ये महत्त्वाची नसून संवेदनशीलता, सहानुभूती आणि माणुसकीही तितकीच आवश्यक आहे. रुग्णांच्या वेदना समजून घेणे, त्यांच्याशी आदराने वागणे आणि त्यांच्या भावनांचा सन्मान करणे ही प्रत्येक डॉक्टरची मूलभूत जबाबदारी आहे. 'व्हाईट कोट' हा केवळ वैद्यकीय व्यवसायाचा पोशाख नसून रुग्णांप्रती असलेली बांधिलकी, प्रामाणिकपणा, सेवाभाव, शिस्त आणि नैतिक जबाबदारी यांचे प्रतीक आहे, असे अधिष्ठाता डॉ. पाटील यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या कल्याणासाठी करावा, गरीब व गरजू रुग्णांची सन्मानपूर्वक सेवा करावी आणि आयुष्यभर शिकण्याची वृत्ती जोपासावी, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी पालक-शिक्षक बैठकीत महाविद्यालयामध्ये रॅगिंगविरोधी उपाययोजना, रॅगिंग प्रतिबंधक नियम, विद्यार्थ्यांची सुरक्षितता, तक्रार नोंदविण्याची व्यवस्था तसेच महाविद्यालयातील सकारात्मक व सन्मानपूर्ण वातावरणाचे महत्त्व याबाबत पालकांना माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी महाविद्यालय आणि पालक यांच्यात नियमित संवाद व समन्वय आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

कार्यक्रमास उपअधिष्ठाता (पदव्युत्तर विभाग) डॉ. नकाते, वैद्यकीय अधीक्षक डॉ. उमाप, कार्यक्रम समन्वयक डॉ. सुदके, महाविद्यालयातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक, निवासी डॉक्टर, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

पुणेकर यांची मानधन ग्रामपंचायत विभागास भेट

■ नारायणगाव (दै. संध्या)



राजश्री शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन योजना ही महाराष्ट्र शासनाची योजना कार्यरत आहे.या योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील ज्येष्ठ साहित्यिक आणि कलावंतांना प्रतिमाहिना रुपये 5000 हजार दिले जातात.

जिल्हा परिषद पुणे येथील ग्रामपंचायत विभागाच्या माध्यमातून कलावंत मानधन योजना कार्यान्वित आहे.या विभागास बिग बॉस सेलिब्रिटी, लावणी सम्राज्ञी सुरेखा पुणेकर यांनी श्री गजानन पाटील मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे जिल्हा परिषद पुणे, श्री भूषण जोशी साहेब उपमुख्य कार्यकारी अधिकारी पुणे जिल्हा परिषद पुणे (पंचायत) यांच्या समवेत संबंधित अधिकाऱ्याची भेट घेऊन कलावंत मानधनाविषयी चर्चा केली. यावेळी त्या म्हणाल्या, प्रत्येक जिल्ह्याला 100 लोककलावंतांच्या संख्येऐवजी ती 500 लोकलावंतांची संख्या करणे गरजेचे आहे. तसेच कागदपत्रांच्या किचकट गोष्टी कमी करुन ज्येष्ठ साहित्यिक व कलावंतांना मानधन कसे मिळेल ?याचा विचार करणे गरजेचे आहे. त्यामुळे सर्वसामान्य ज्येष्ठ कलाकारांना त्याचा फायदा होईल. या चर्चेच्या निमित्ताने लोक शाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे महाराष्ट्र शासन समाजभूषण पुरस्कार्थी तथा तमाशा अभ्यासक काशिनाथ आल्हाट यांनी ही या कामाचा आढावा घेतला. तसेच कलावंतांच्या समस्या ऐकून घेवून कलाकारांना योग्य मार्गदर्शन करणारे या विभागाचे गणेश ओव्हाळ साहेब यांच्या कार्याचे लावणी सम्राज्ञी सुरेखा पुणेकर यांनी तोंड भरून कौतुक केले. यावेळी विभागाचे श्री बाळासाहेब दरवडे सहाय्यक गटविकास अधिकारी (पंचायत), श्री ज्ञानेश्वर वाघमारे विस्तार अधिकारी (पंचायत),गणेश ओव्हाळ साहेब (पंचायत) उपस्थित होते. यावेळी विभागाच्या वतीने एक पुस्तक भेट देण्यात आले.

'सुरक्षित बालपण अभियान' उत्साहात

■ नारायणगाव (दै. संध्या)

बालकांचे अधिकार, वैयक्तिक सुरक्षितता आणि इंटरनेट वापरताना घ्यावयाची काळजी याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, इनामवाडी येथे मंगळवारी 'सुरक्षित बालपण अभियान' राबविण्यात आले. तालुका विधी सेवा समिती, जुन्नर यांच्या वतीने आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांना बालकांच्या संरक्षणासाठी असलेले कायदे आणि कायदेशीर मदतीच्या सुविधांची माहिती देण्यात आली. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या वार्षिक कार्यक्रमानुसार आयोजित या अभियानाला जिल्हा न्यायाधीश-१ तथा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष एस. बी. शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरुवात झाली. जुन्नर वकील बार असोसिएशनचे सचिव ॲड. पुराणिक नलावडे, ॲड. तब्बसुम तय्यबखान पठाण आणि ॲड. ऐश्वर्या लांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी बालकांच्या संरक्षणासाठी असलेल्या पॉक्सो कायद्याची माहिती देतानाच वैयक्तिक सुरक्षितता, इंटरनेटचा योग्य वापर, ऑनलाइन फसवणूक व अन्य धोक्यांपासून बचाव आणि तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.बालकांवर अन्याय किंवा गैरप्रकार घडल्यास गप्प न राहता विश्वासू व्यक्तीकडे मदत मागावी, तसेच उपलब्ध कायदेशीर यंत्रणांचा आधार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. गरजू बालकांना मिळणाऱ्या मोफत कायदेविषयक सहाय्याची माहितीही यावेळी देण्यात आली.



विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला उद्योजकतेची जोड

■ वालचंदनगर (दै. संध्या)

■ विश्वासराव रणसिंग महाविद्यालयात उपक्रम

■ सुगंधी उटणे, शिकेकाई, अत्तर, आकाशकंदील आणि रंगीत पणत्यांची निर्मिती; विद्यार्थ्यांना व्यवहारज्ञानाचे धडे

विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची आवड निर्माण व्हावी, त्यांना व्यावहारिक ज्ञान मिळावे आणि स्वावलंबनाची भावना विकसित व्हावी, या उद्देशाने कळंबच्या इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठान संचालित विश्वासराव रणसिंग महाविद्यालयात वाणिज्य विभाग आणि उद्योजकता विकास कक्षाच्या वतीने उद्योजकता विकास कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी सुगंधी उटणे, शिकेकाई, अत्तर, आकाशकंदील आणि रंगीत पणत्यांची निर्मिती केली. या वस्तूंचे मान्यवरांनी कौतुक केले.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा आनंदी रणसिंग, उपाध्यक्ष प्रकाश कदम, सचिव वीरसिंह रणसिंग, विश्वस्त राही रणसिंग, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळंगे, उपप्राचार्य डॉ. प्रशांत शिंदे, वाणिज्य विभाग समन्वयक डॉ. विलास बुवा, विभागप्रमुख डॉ. योगेश खरात आणि कार्यक्रम समन्वयक प्रा. ज्ञानेश गवळी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानाबरोबरच व्यावसायिक कौशल्ये आणि उद्योजकतेचे व्यावहारिक ज्ञान मिळावे, यासाठी संस्था नेहमीच सहकार्य करेल, अशी ग्वाही संस्थेचे सचिव वीरसिंह रणसिंग यांनी दिली. विद्यार्थ्यांनी स्वतःमधील कौशल्ये ओळखून त्यांना व्यवसायाची जोड द्यावी आणि स्वावलंबी बनावे, असे आवाहनही त्यांनी केले. विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमांना केवळ दिवाळीपुरते मर्यादित न ठेवता वर्षभर विविध सण, उत्सव आणि दैनंदिन गरजांनुसार वस्तू तयार करून त्यांची विक्री करावी, असे आवाहन संस्थेच्या विश्वस्त राही रणसिंग यांनी केले. वस्तूंची किंमत ठरविणे, खर्चाचा हिशेब ठेवणे, ग्राहकांशी संवाद साधणे आणि विक्रीचे नियोजन करणे यांतून विद्यार्थ्यांना बाजारपेठेचा अनुभव मिळेल. त्यामुळे त्यांच्यात व्यवहारज्ञान, आर्थिक साक्षरता आणि स्वावलंबन विकसित होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबत प्रत्यक्ष व्यवसायाचे धडे मिळणार असून, भविष्यात रोजगार शोधण्याबरोबरच रोजगारनिर्मिती करण्याची क्षमताही विकसित होण्यास मदत होणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नितीन रुपनवर यांनी केले, तर प्रा. सोनाली चव्हाण यांनी आभार मानले.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



'बाप्पाचा कट्टा' उपक्रमाचा ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते पुणे येथे शुभारंभ

पुणे : दैनिक संध्या

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा गौरव जपत, सांस्कृतिक वारसा संवर्धनाच्या उद्देशाने 'बाप्पाचा कट्टा' हा उपक्रम राबविण्यात येत असून या उपक्रमाचा फर्ग्युसन महाविद्यालय येथे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. कलारसिक, साहित्यप्रेमी, संस्कृतीरक्षक, गणेश भक्त व सर्व नागरिकांनी बाप्पाचा कट्टा उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन ॲड. आशिष शेलार यांनी केले. यावेळी अभिनेते प्रवीण तरडे, Bappp.org चे व्यवस्थापकीय संचालक श्रीपाद अष्टेकर उपस्थित होते. श्री.शेलार म्हणाले, राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने यावर्षी गणेशोत्सव 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्यात आला. या महोत्सवाअंतर्गत देशात व राज्यात तालुका स्तरापर्यंत विविध उपक्रम राबविण्यात आले. यावर्षी दुबईमध्ये देखील राज्य महोत्सव साजरा करण्यात आला. या महोत्सवाची वर्ल्ड युनोस्कोकडे वाटचाल असून सुरु आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या bappa.org उपक्रमांतर्गत 'बाप्पाचा कट्टा' हा ९० दिवसांच्या सांस्कृतिक महाउत्सवात या उपक्रमाच्या माध्यमातून सर्वसामान्य कुटुंबे, मित्रमंडळी आणि कलाकारांना कलागुण सादर करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. उखाणे, मंगळागौरीचे खेळ, भोंडला, पोवाडे, विविध लोककला, मराठी म्हणी, अंताक्षरी अशा पारंपरिक कलाप्रकारांसह आधुनिक कला सादर करण्याची संधी मिळणार आहे. गणेशोत्सव धार्मिक, श्रद्धेचे अधिष्ठान आहे.या उत्सवाला राष्ट्रीय व सामाजिक उपक्रमांची जोड देण्यात आली आहे. कला, साहित्य, रंगसंगती यांचा सुंदर मिलाप इथे पाहायला मिळतो. Bappa.Org हे व्यासपीठ सर्व जगभरातील गणेश भक्तांना आपल्या कथा सांगण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

परदेश अभ्यास दौऱ्यातील शेतकरी निवडीसाठी होणारी सोडत प्रक्रिया रद्द

पुणे : दैनिक संध्या

राज्य शासनाच्या सन २०२६-२७ मधील शेतकऱ्यांसाठीच्या परदेश अभ्यास दौरा योजनेंतर्गत शेतकऱ्यांच्या निवडीसाठी २ नोव्हेंबर रोजी होणारी सोडत प्रक्रिया काही अपरिहार्य कारणास्तव रद्द करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वैभव तांबे यांनी कळविली आहे.

पुणे अग्निशमन दलाकडून अग्निसुरक्षा आणि आपत्कालीन प्रतिसाद अधिक सक्षम

पुणे : दैनिक संध्या

पुणे शहरातील वाढत्या विकासाच्या पार्श्वभूमीवर अग्निशमन दलाकडून आग प्रतिबंधक उपाययोजना, सुरक्षित स्थलांतर, जनजागृती आणि आपत्कालीन प्रतिसाद अधिक सक्षम करण्यावर भर दिला जात आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, २०२५ मध्ये आगीच्या ३,०३३ घटनांची नोंद झाली, त्यापैकी ५११ घटना विद्युत शॉर्टसर्किटमुळे घडल्या. जानेवारी ते ऑगस्ट २०२६ दरम्यान २,०३५ अग्निशमन कॉल नोंदविण्यात आले असून, त्यापैकी ३१९ कॉल विद्युत शॉर्टसर्किटशी संबंधित होते. त्यामुळे विद्युत यंत्रणांची नियमित देखभाल आणि अग्निसुरक्षेविषयी जनजागृतीचे महत्त्व अधोरेखित होते. मुख्य अग्निशमन अधिकारी गणेश सोनुने यांनी सांगितले की, 'अग्निप्रतिबंधक उपाययोजनांची सुरुवात इमारतीच्या नियोजनाच्या टप्प्यापासूनच झाली पाहिजे. विशेषतः उंच इमारतींमध्ये उंचीवर आग विझविणे आणि नागरिकांचे सुरक्षित स्थलांतर करणे अधिक गुंतागुंतीचे असल्याने विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. इमारतींच्या आराखड्यांच्या निर्मितीमध्ये वास्तुविशारदांची भूमिका स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, वास्तुविशारदांनी UDCPR मधील तरतुदींनुसार इमारतींचे नियोजन करणे आवश्यक आहे. इमारतीची उंची आणि लागू नियमांनुसार अग्निशमन स्थलांतर लिफ्ट, दाबयुक्त लॉबी आणि अग्निशमन वाहनांसाठी आवश्यक प्रवेशमार्ग यांसारख्या सुरक्षाविषयक बाबींचा आराखड्यात समावेश करणे गरजेचे आहे. पुण्याच्या वेगवान विकासासोबत अग्निसुरक्षा आणि सुरक्षित स्थलांतराचे नियोजन अधिक सक्षम होणे आवश्यक आहे. विशेषतः उंच इमारतींमध्ये नियमांनुसार अग्निशमन स्थलांतर लिफ्ट, सुरक्षित बाहेर पडण्याचे मार्ग आणि आवश्यक अग्निसुरक्षा यंत्रणा कार्यरत असणे महत्त्वाचे आहे. प्रतिबंधात्मक उपाययोजना, योग्य पूर्वतयारी आणि जनजागृती यांच्या माध्यमातून नागरिकांचे प्राण सुरक्षित ठेवता येऊ शकतात.

दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी समन्वयाने काम करा

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार : पिण्याचे पाणी, रब्बी हंगाम, चारा उपलब्धता आणि जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देण्याच्या सूचना

■ उपमुख्यमंत्री पवार यांच्याकडून पुणे जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा

■ पुणे (दै. संध्या)



जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन, चारा उत्पादन, जलसंधारणाची कामे आणि टंचाई निवारणाच्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून नागरिकांना वेळेत मदत उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीत उपमुख्यमंत्री पवार यांनी पुणे जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, महापौर मंजुषा नागापुरे, खासदार सुप्रिया सुळे, आमदार विजय शिवतारे, आमदार राहुल कुल, आमदार शंकर मांडेकर, आमदार बाबाजी काळे, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव डॉ. राजेश देशमुख,जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील,निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

पिण्यासाठी राखीव ठेवलेल्या पाण्याचा वापर नियोजनानुसार करावा. ग्रामीण भागात आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा. रब्बी हंगामातील पिकांसाठी पाण्याचे नियोजन करताना पिण्याच्या पाण्याला प्राधान्य द्यावे, अशा सूचना उपमुख्यमंत्री पवार यांनी दिल्या.

दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी चारा उपलब्ध व्हावा, यासाठी चारा लागवड प्रकल्प राबविण्यात येत असून, शेतकऱ्यांना बियाणे उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात येत आहे. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करून कमी पाण्यात येणाऱ्या चारा पिकांच्या लागवडीला प्रोत्साहन द्यावे, असे त्यांनी सांगितले.

जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेऊन पाण्याचे स्रोत बळकट करावेत. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून आवश्यक कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही करावी. नगरपरिषद क्षेत्रांसह ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचे प्रभावी नियोजन करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

दुष्काळी परिस्थितीमुळे इतर भागातून नागरिकांचे स्थलांतर होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने सतर्क राहावे. शासकीय योजनांची अंमलबजावणी विलंब न करता करून नागरिकांना तातडीने मदत उपलब्ध करून द्यावी. यासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वय राखावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केले. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती आणि प्रशासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या टंचाई निवारणाच्या उपाययोजनांची माहिती दिली.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत जिल्ह्यात १ हजार ५४ जलसंधारणाची कामे निश्चित करण्यात आली आहेत. शासनाच्या निर्देशानुसार कामाबाबत आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरू असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी दिली. शेततळी, बंधाऱ्यांची दुरुस्ती, जलस्रोतांचे बळकटीकरण आणि कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांना फळ्या बसविण्याबाबत कामे प्रस्तावित आहेत. बैठकीला जिल्ह्यातील विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

नागपूरच्या पराभवाची जबाबदारी माझी : बावनकुळेंची कबुली

■ पुणे (दै. संध्या)

विधान परिषद निवडणुकीतील निकालानंतर भाजप आत्मपरीक्षण करणार असल्याचे राज्याचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले. नागपूर आणि पुणे या दोन्ही जागा भाजपसाठी प्रतिष्ठेच्या होत्या. मात्र, नागपूरमधील पराभवाची जबाबदारी आपण स्वीकारत असल्याचे सांगत, पराभवाची कारणे शोधून चुका सुधारण्याचा प्रयत्न केला जाईल, असे बावनकुळे यांनी पुण्यात माध्यमांशी बोलताना सांगितले. महायुतीतील कोणत्या घटकांनी अपेक्षेप्रमाणे काम केले नाही, याचाही आढावा घेतला जाणार आहे. पक्षविरोधी काम झाल्याचे आढळल्यास संबंधितांना समज दिली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रवींद्र धंगेकर यांच्या वक्तव्यावर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली. धंगेकर यांनी बोलताना संयम ठेवावा आणि महाराष्ट्राच्या जनतेने दिलेला कौल समजून घ्यावा, असे ते म्हणाले. अशा विषयांवर बोलणे धंगेकरांच्या उंचीचे नाही, अशी टीकाही त्यांनी केली. निवडणुकीतील पराभवाची कारणे शोधणे आवश्यक असल्याचे बावनकुळे यांनी नमूद केले. तसेच, एकनाथ शिंदे यांनी रवींद्र धंगेकर यांना समज द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

दुष्काळामुळे पीडीसीसी बँकेच्या निवडणुकीला ब्रेक..!

पुणे जिल्हा बँकेची निवडणूक लांबणीवर

■ पुणे (दै. संध्या)

राज्यातील दुष्काळग्रस्त जिल्ह्यांमध्ये सहकारी संस्थांच्या निवडणुका अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यामुळे राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या (पीडीसीसी) निवडणूक प्रक्रियेलाही ब्रेक लागला आहे. निवडणूक प्रक्रिया ज्या टप्प्यावर आहे, त्याच टप्प्यावर ती थांबविण्याचे आदेश देण्यात आल्याने विद्यमान संचालक मंडळाला मुदतवाढ मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला होता. संलग्न सभासद संस्थांकडून प्रतिनिधींच्या नावांचे ठराव मागविण्यात आले होते. त्यानुसार प्रारूप मतदारयादी तयार करून हरकती मागविण्यात आल्या होत्या. विविध गटांतून हरकती व आक्षेप दाखल झाले असून, त्यावरील सुनावणीची प्रक्रिया सुरू होती. दरम्यान, मंगळवारी राज्य शासनाने सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्याचा निर्णय घेतल्याने ही प्रक्रिया थांबली आहे. पीडीसीसी बँकेच्या निवडणुकीसाठी अ, ब, क आणि ड वर्गातील सभासद संस्थांची संख्या ३ हजार ९८१, तर व्यक्ती सभासदांची संख्या १ हजार ६६७ अशी एकूण ५ हजार ६४८ मतदारसंख्या निश्चित करण्यात आली होती. अ वर्गातील तालुका सोसायटी मतदारसंघात १ हजार ३६४, ब वर्गात १३७, क वर्गात १ हजार ३, तर ड वर्गात १ हजार ४७७ ठराव दाखल झाले होते. या प्रारूप यादीवर २३ ऑक्टोबरपर्यंत हरकती व आक्षेप नोंदविण्याची मुदत होती. त्यानंतर ५ नोव्हेंबरला अंतिम मतदारयादी जाहीर होणार होती. मात्र, शासनाच्या निर्णयामुळे निवडणुकीचे पुढील वेळापत्रक अनिश्चित झाले आहे. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही जिल्ह्याच्या सहकार आणि राजकारणातील महत्त्वाची संस्था मानली जाते. सुमारे ३० हजार कोटी रुपयांची उलाढाल असलेल्या या बँकेच्या संचालक मंडळात दिलीप वळसे पाटील, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, माजी आमदार रमेश थोरात, संग्राम थोपटे, दिलीप मोहिते पाटील आणि संजय जगताप यांच्यासह अनेक महत्त्वाच्या नेत्यांचा समावेश आहे.

पावसाचे पाणी जमिनीत जिरविण्याचा जिल्हा परिषदेचा विचार

■ पुणे (दै. संध्या)



पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे शेतात साचणारे पाणी आणि उन्हाळ्यात कोरड्या पडणाऱ्या विहिरी, या दोन्ही समस्यांवर मात करण्यासाठी आता प्रत्येक शेतात पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्याचा पर्याय पुढे येत आहे. 'जलतारा' संकल्पनेच्या माध्यमातून शेतातील नैसर्गिक उताराच्या ठिकाणी दगडांनी भरलेले शोषखड्डे तयार करून पावसाचे पाणी जमिनीत जिरविण्याचा प्रयोग पुणे जिल्ह्यात राबविण्याचा विचार जिल्हा परिषदेकडून सुरू आहे. भूजल पुनर्भरणासोबतच अतिवृष्टीच्या पाण्याचा निचरा आणि रब्बी हंगामातील सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता वाढविणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. भूजलाचा वाढता उपसा आणि पावसाचे पाणी वाहून जाण्यामुळे जलसंधारणासमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे. पारंपरिक जलसंधारणाच्या कामांबरोबरच प्रत्येक शेतात पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्याची व्यवस्था केल्यास त्याचा थेट शेतीला फायदा होऊ शकतो. विशेषतः अतिवृष्टीमुळे शेतात साचणारे पाणी आणि पावसाळ्यानंतर रब्बी हंगामात भासणारी सिंचनाची गरज लक्षात घेऊन 'जलतारा' संकल्पनेचा विचार केला जात आहे. 'जलतारा' संकल्पनेअंतर्गत जालना जिल्ह्यातील मंठा आणि परतूर तालुक्यांतील गावांमध्ये लोकसहभाग, स्वयंसेवी संस्था आणि कंपन्यांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीच्या (सीएसआर) माध्यमातून कामे करण्यात आली आहेत. या अनुभवांच्या आधारे पुणे जिल्ह्यातही हा प्रयोग राबविण्याच्या हालचाली सुरू आहेत. जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी या उपक्रमाबाबत सकारात्मकता दर्शविली आहे. मात्र, जिल्ह्यात कोणत्या भागात, किती प्रमाणात आणि कोणत्या कालमर्यादेत ही कामे करायची, याबाबत अद्याप निश्चित निर्णय झालेला नाही.

पोखरी घाटात इको दरीत कोसळली; दोघांचा मृत्यू, चार जण गंभीर

■ पुणे (दै. संध्या)

भीमाशंकर-मंचर मार्गावरील पोखरी घाटात इको गाडी दरीत कोसळून झालेल्या भीषण अपघातात चालकासह दोघांचा मृत्यू झाला, तर चार जण गंभीर जखमी झाले. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने गाडी थेट दरीत कोसळून तिने अनेक पलट्या घेतल्या. या अपघातात गाडीचा पूर्णपणे चेंदामेंदा झाला. अपघातात कांचन संदीप केंगले (वय ३५, रा. जांभोरी, नांदुरकीचीवाडी, ता. आंबेगाव), योगेश देवराम भांगे (वय २६, रा. तांबे, ता. जुन्नर), शिवाजी मारुती डामसे (वय ६०, रा. कोंढवळ, ता. आंबेगाव) आणि सुभद्रा प्रमोद केंगले (वय ४०, रा. जांभोरी, ता. आंबेगाव) हे चौघे गंभीर जखमी झाले. एमएच १४/केडब्ल्यू २०९१ क्रमांकाची इको गाडी घोडेगाव येथून भीमाशंकरच्या दिशेने जात होती. गाडीमध्ये आदिवासी भागातील स्थानिक नागरिक प्रवास करत होते. ही गाडी डिंभे येथील गोरक्ष राक्षे यांच्या मालकीची असून, ज्ञानेश्वर गोविंद गवारी (वय ४१, रा. ढगेवाडी) हे ती चालवत होते. पोखरी घाटात चालकाचे नियंत्रण सुटल्याने गाडी थेट दरीत कोसळली. या अपघातात चालक ज्ञानेश्वर गवारी आणि अंदाजे ७० वर्षांच्या एका अनोळखी महिलेचा मृत्यू झाला. मृत महिला स्थानिक रहिवासी असल्याची माहिती असून, तिची ओळख अद्याप पटलेली नाही. पोखरी घाटात अपघात झाल्याची माहिती मिळताच परिसरातील गावांतील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली.

दिलीप कुमार ३० ऑक्टोबर रोजी पुणे जिल्ह्यातील पाणलोट विकास कामांची करणार पाहणी

राज्यातील १४० पाणलोट प्रकल्पांसाठी १,२५१.११ कोटींचा तरतूद; ८५ टक्के आर्थिक प्रगती

■ पुणे (दै. संध्या)

केंद्र शासनाच्या भूमी संसाधन विभागाचे सचिव दिलीप कुमार (भा.प्र.से.) हे महाराष्ट्रातील 'प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना : पाणलोट विकास घटक २.०' अंतर्गत सुरू असलेल्या जलसंधारण व पाणलोट विकासाच्या कामांचा आढावा घेण्यासाठी शुक्रवार , दि. ३० ऑक्टोबर रोजी पुणे जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात ते पुणे जिल्ह्यातील खेड प्रकल्पांतर्गत वरुडे, गुळाणी, वाफगाव आणि कन्हेरसर या गावांतील पाणलोट क्षेत्रातील कामांची प्रत्यक्ष पाहणी करणार आहेत. महाराष्ट्रातील ३० जिल्ह्यांमध्ये मंजूर १४० पाणलोट प्रकल्पांसाठी १,२५१.११ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, दि. २६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत १,०५७.५३ कोटी रुपये खर्च झाले आहेत. त्यामुळे या प्रकल्पांची आर्थिक प्रगती ८५ टक्क्यांवर पोहोचली आहे.

केंद्र पुरस्कृत ग्रामीण विकास मंत्रालयाच्या भूमी संसाधन विभागामार्फत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना : पाणलोट विकास घटक २.० राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत महाराष्ट्रातील ३० जिल्ह्यांमध्ये एकूण १४० पाणलोट प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. या प्रकल्पांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या हिश्श्यासह एकूण १,२५१.११ कोटी रुपयांची तरतूद आहे. त्यापैकी दि. २६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत १,०५७.५३ कोटी रुपये खर्च झाले आहेत.

एकूण १४० प्रकल्पांपैकी ४८ प्रकल्प पूर्ण झाले असून, आणखी ५७ प्रकल्पांमध्ये ८० टक्क्यांपेक्षा अधिक खर्च झाला आहे. या योजनेंतर्गत नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन आणि उत्पादन प्रणाली या दोन प्रमुख घटकांच्या माध्यमातून जलसंधारण, मृदसंधारण, शेतीची उत्पादकता वाढविणे आणि ग्रामीण कुटुंबांच्या उपजीविकेला बळकटी देण्यावर भर देण्यात येत आहे.

नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन घटकांतर्गत सविस्तर प्रकल्प अहवालात (DPR) समाविष्ट २५ हजार ४९६ कामांपैकी २१ हजार ६१५ कामे पूर्ण झाली आहेत. या घटकासाठी ५८८.०३ कोटी रुपयांची तरतूद असून, पूर्ण झालेल्या कामांचे मूल्य ५१३.३८ कोटी रुपये आहे.

या कामांमध्ये शेततळी, सामुदायिक शेततळी, सलग समतल चर (CCT), बांधबंदिस्ती, नाला खोलीकरण, सिमेंट नाला बांध, गॅबियन संरचना, भूजल पुनर्भरण संरचना आणि फळबाग लागवड आदींचा समावेश आहे. या उपाययोजनांमुळे पावसाचे पाणी अडविणे, जमिनीत पाणी मुरविणे, मृदेची धूप कमी करणे आणि शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढविण्यास मदत होत आहे. त्याचबरोबर नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन आणि पाणलोट क्षेत्रातील जलस्रोत बळकट करण्यासाठी या कामांचा उपयोग होत आहे. योजनेच्या उत्पादन प्रणाली घटकांतर्गत एकूण ३९ हजार ७१५ कामांपैकी ३८ हजार १७५ कामे पूर्ण झाली आहेत. या घटकासाठी १८७.६७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, पूर्ण झालेल्या कामांचे मूल्य १८३.४५ कोटी रुपये आहे. नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन आणि उत्पादन प्रणालीतील सुधारणा यांची सांगड घालून ग्रामीण कुटुंबांच्या उपजीविकेला बळकटी देण्याचा या घटकाचा उद्देश आहे. जलसंधारणाच्या माध्यमातून शेतीसाठी आवश्यक संसाधने उपलब्ध करून देतानाच कृषी उत्पादन वाढविणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला पूरक वातावरण निर्माण करण्यावर भर देण्यात येत आहे.

आगामी पाणलोट विकास कार्यक्रम WDC-PMKSY ३.० च्या पूर्वतयारीचाही या दौऱ्यात आढावा घेण्यात येणार आहे. महाराष्ट्रात भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) आणि विविध तांत्रिक माहिती स्रोतांच्या आधारे संभाव्य पाणलोट क्षेत्रांचे प्राधान्यक्रम निश्चित करण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

पर्जन्याधारित शेतीचे क्षेत्र, नापीक जमीन, भूजलस्थिती, जमिनीची क्षमता आणि पाणलोट क्षेत्रांचा आकार आदी निकषांचा विचार करून प्राथमिक प्रकल्प अहवाल (PPR) तयार करण्याची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. वैज्ञानिक माहिती आणि तंत्रज्ञानाच्या आधारे योग्य क्षेत्रांची निवड करून जलसंधारणाच्या कामांचे नियोजन अधिक परिणामकारक करण्याचा यामागील उद्देश आहे.

राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जलसंधारणाच्या कामांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. राज्यातील दुष्काळग्रस्त घोषित ३०४ तालुक्यांपैकी ७६ तालुक्यांचा या योजनेत समावेश आहे. या तालुक्यांमध्ये पाणलोट विकासाच्या माध्यमातून पाणीसाठा निर्माण करणे आणि उपलब्ध जलसंसाधनांचे बळकटीकरण करणे यावर भर देण्यात येत आहे.

या अंतर्गत पाझर तलाव, साठवण तलाव, साठवण बंधारे आणि कोल्हापूर पद्धतीचे बंधारे यांसारखी जलसंधारणाची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या कामांमुळे पावसाचे पाणी साठविणे, भूजल पुनर्भरण वाढविणे आणि भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता कमी करण्यास मदत होणार आहे. परिणामी, संबंधित गावांमध्ये पाण्याची उपलब्धता वाढून शेती आणि ग्रामीण जनजीवनाला लाभ होण्याची अपेक्षा आहे.

जलसंधारणातून शाश्वत ग्रामीण विकासाला चालना

महाराष्ट्रातील पाणलोट विकास कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी केंद्र व राज्य शासनातील समन्वय, कामांची गुणवत्ता, निर्धारित वेळेत पूर्तता आणि उपलब्ध निधीचा परिणामकारक वापर या बाबींना या आढावा दौऱ्याच्या माध्यमातून महत्त्व प्राप्त झाले आहे. मृद व जलसंधारणाच्या कामांद्वारे जलस्रोत बळकट करणे, संरक्षित सिंचन व्यवस्था निर्माण करणे, शेतीची उत्पादकता वाढविण्यास पूरक वातावरण तयार करणे आणि ग्रामीण भागातील शाश्वत विकासाला चालना देणे, ही या योजनेची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

वरिष्ठ अधिकारी दौऱ्यात सहभागी

या दौऱ्यादरम्यान राज्याच्या मृद व जलसंधारण विभागाचे सचिव डॉ. जितेंद्र पापळकर, केंद्र शासनाच्या भूमी संसाधन विभागाचे सहसचिव नितीन खाडे , वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कमलाकर रणदिवे, पुणे विभागाचे मुख्य अभियंता नितीन दुसाने, अधीक्षक अभियंता चेतन कलशेट्टी, उपसचिव मृदुला देशपांडे, अवर सचिव देवेंद्र भामरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अश्विनी जगताप, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दीपा बापट, वित्त अधिकारी वैशाली बिटे, कक्ष अधिकारी प्रतीक शेंडे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी सहभागी होणार आहेत.

खेड प्रकल्पातील चार गावांमध्ये प्रत्यक्ष पाहणी

केंद्रीय सचिव दिलीप कुमार यांच्या दि. ३० ऑक्टोबर रोजीच्या दौऱ्यात पुणे जिल्ह्यातील खेड प्रकल्पांतर्गत वरुडे, गुळाणी, वाफगाव आणि कन्हेरसर या गावांतील पाणलोट विकासाच्या कामांची पाहणी करण्यात येणार आहे. पाणलोट क्षेत्राच्या माथ्यापासून पायथ्यापर्यंत राबविण्यात आलेल्या कामांची अंमलबजावणी, नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन, कामांची गुणवत्ता आणि स्थानिक पातळीवरील कामांचा आढावा या भेटीदरम्यान घेतला जाणार आहे. या दौऱ्याच्या अनुषंगाने दि. २९ ऑक्टोबर रोजी मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र राज्याचे सचिव डॉ. जितेंद्र पापळकर (भा.प्र.से.), वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेचे अधिकारी आणि पाणलोट विकास व्यवस्थापन क्षेत्रीय अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत राज्यातील प्रकल्पांच्या अंमलबजावणीची सद्यस्थिती आणि कामांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात येणार आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



प्रभात मित्र मंडळाचे संस्थापक हिरामण गांगुर्डे यांचा १५ वा स्मृती दिन

मुंबई : दैनिक संध्या

विक्रोळी कन्नमवार नगरातील ज्येष्ठ नागरिक प्रभात मित्र मंडळात मंडळाचे संस्थापक हिरामण गांगुर्डे यांचा १५ वा स्मृती दिन मंडळाच्या हरि ओम कट्ट्यावर साजरा करण्यात आला.या प्रसंगी हिरामण गांगुर्डे यांचे सुपुत्र संजय व शशिकांत, मुलगी आशा गांगुर्डे सध्याची ज्योती ढिवाळ,नातू अभय ढिवाळ , मंडळाचे सचिव ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे, माजी अध्यक्ष सुरेश सरनोबत,माजी सचिव संजय मयेकर,सी.के. सर्वगोड आदी मान्यवर उपस्थित होते.बाबा म्हणजे समुद्रातलं जहाज असतं. खंबीरपणे आधाराचं नावं असतं. बाबा म्हणजे कधीही न आटणाऱ्या मायेचा सागर असतं अशा शब्दांत कवितेतून आशा (ज्योती ढिवाळ) यांनी आपल्या कवितेतून आपल्या वडिलांच्या भावनांना वाट करून दिली.याप्रसंगी नासिकेत पानसरे, सुरेश सरनोबत, संजय मयेकर,सी के.सर्वगोड यांची भाषणे झाली.

कांजूरमार्ग डंपिंग ग्राउंड बंद नव्हे जलाव आंदोलन : आ. सुनील राऊत यांचा इशारा



मुंबई : दैनिक संध्या

गेली १५ वर्षे कांजूरमार्ग, विक्रोळी कन्नमवार नगर, भांडूप परिसरातील नागरिकांना त्रास देणाऱ्या कांजूरमार्ग डंपिंग ग्राउंड बंद नव्हे तर जलाव आंदोलन छेडण्याचा इशारा विक्रोळीचे आमदार सुनील राऊत यांनी दिला आहे.यावेळी घाटकोपर ते मुलुंड रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येणार आहे.आपले कार्यकर्ते शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विभागप्रमुख परम यादव व उपविभाग प्रमुख चंद्रशेखर जाधव,विक्रोळी विधानसभा संघटक शंकर ऊर्फ नाना ढमाले यांना आदेश देताना ते म्हणाले, किती दिवस डंपिंग ग्राऊंडचा त्रास काढायचा. ईशान्य मुंबईचा रस्ता जाम करा.डंपिंग ग्राउंडची मनमानी सहन करायची नाही.नगरसेविका तथा महिला बालकल्याण समितीच्या सदस्या सुनिता चंद्रशेखर जाधव यांच्या पुढाकाराने विक्रोळी कन्नमवार नगरातील हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्याच्या भूमिपूजन सोहळा नुकताच पार पडला.या प्रसंगी आमदार सुनील राऊत बोलत होते.



मंगळसूत्र चोर महिलेला नारायणगाव पोलिसांनी ठोकल्या बेड्या

नारायणगाव : दैनिक संध्या

एसटी बसमध्ये चढताना प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेत ८० वर्षीय वृद्ध महिलेच्या गळ्यातील सुमारे सव्वा लाख रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र चोरी करणाऱ्या महिलेला नारायणगाव पोलिसांनी अवघ्या चार तासांत अटक केली. पोलिसांनी चोरीला गेलेला मुद्देमाल हस्तगत करून वृद्ध महिलेला परत दिला. मंगळसूत्र पुन्हा मिळाल्याने आजीबाईंनी पोलिसांचे आभार मानले. रखमाबाई अनंता दिवटे वय ८०, रा. इंगळून, ता. जुन्नर, जि. पुणे या २६ ऑक्टोबर रोजी दुपारी नारायणगाव एसटी बसस्थानकातून जुन्नरकडे जाणाऱ्या बसमध्ये चढत होत्या. त्यावेळी बसमध्ये चढण्यासाठी प्रवाशांची गर्दी झाली होती. या गर्दीचा फायदा घेत अज्ञात महिलेने दिवटे यांच्या गळ्यातील सुमारे दीड तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र, तसेच दोन सोन्याचे मणी असलेली पोत चोरून नेली. याप्रकरणी त्यांनी नारायणगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रार मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण सपांगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक जगदेव आप्पा पाटील, महिला पोलीस उपनिरीक्षक धोंगडे, सहायक फौजदार डावखर, महिला हेड कॉन्स्टेबल सुवर्णा गडगे, महिला पोलीस कॉन्स्टेबल धनश्री फापाळे, कविता गेंगजे, पोलीस कॉन्स्टेबल गोरक्ष हासे, महिला होमगार्ड भालेकर, वाहतूक पोलीस हवालदार काळुराम मासाळकर, पोलीस मित्र पिंजारी आणि त्रिभुवन सोनवणे यांनी तपास सुरू केला. तांत्रिक माहिती, सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी संशयित महिलेचा शोध घेतला. अवघ्या चार तासांत पोलिसांनी महिलेला ताब्यात घेतले. महिला पोलीस कॉन्स्टेबल सुवर्णा गाडगे यांनी संशयित महिलेची चौकशी केली असता, तिने आपले नाव महादेवी सर्जेराव देडे वय ३४, रा. जयनगर, जि. लातूर असे सांगितले. चौकशीत तिने चोरी केल्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यानंतर चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. २७ ऑक्टोबर रोजी चोरीला गेलेले मंगळसूत्र रखमाबाई दिवटे यांना परत देण्यात आले. या प्रकरणातील आरोपी महिलेला न्यायालयीन प्रक्रियेनंतर येरवडा कारागृहात पाठविण्यात आले.

मानव संसाधन हे लोक आणि संस्कृतीशी संबंधित - चैत्राली पाटेकर

पिंपरी, पुणे : दैनिक संध्या

मानव संसाधन आणि मनुष्यबळ विकास हे क्षेत्र लोक आणि संस्कृतीशी संबंधित आहे. मानव संसाधन म्हणजे लोकांची काळजी घेणे. कोणतेही तंत्रज्ञान माणसांची जागा घेऊ शकत नाही, ते तुम्हाला फक्त डेटा देते. तंत्रज्ञान जीवन सुलभ करते, करिअर घडवण्यासाठी तंत्रज्ञान आवश्यक आहे त्यासाठी स्वतःला अद्ययावत ठेवा असे मार्गदर्शन पीपल अँड कल्चर अडोर पावरट्रोन च्या प्रमुख चैत्राली पाटेकर यांनी केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट येथे आयोजित केलेल्या 'आरंभ' या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी फोसेको ह्युमन रिसोर्स डायरेक्टर प्राची संचाल, एसबीपीआयएम संचालक डॉ. कीर्ती धारवाडकर, ज्येष्ठ स्त्री रोग तज्ञ व आरोग्य संशोधक डॉ. वैजयंती पटवर्धन, जपानी भाषा संचालक डॉ. मानसी शिरगुरकर, शैक्षणिक प्रमुख रूपाली कुदरे आदी उपस्थित होते. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्राथमिक शिक्षकांना ३३ हजारांचे सानुग्रह अनुदान जाहीर!

प्रा. डॉ. विशाल कडणे यांच्या मागणीला यश; मुंबईतील सुमारे ३ हजार शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लाभ

■ भिवंडी (दै. संध्या)

मुंबईतील खासगी प्राथमिक शाळांमधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी यंदाची दिवाळी आनंदाची ठरणार आहे. दिवाळीनिमित्त यंदा प्रत्येकी ३३ हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याची घोषणा करण्यात आली आहे. मुंबई शहर शिक्षक विकास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. विशाल कडणे यांनी केलेल्या मागणीला यश आले असून, या निर्णयाचा मुंबईतील सुमारे तीन हजार कार्यरत शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लाभ मिळणार आहे. मुंबईच्या महापौर रितू तावडे यांच्या दालनात सानुग्रह अनुदानासंदर्भात आयोजित संयुक्त बैठकीत हा निर्णय जाहीर करण्यात आला. यावेळी उपमहापौर संजय घाडी, विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर, स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे, सभागृह नेते गणेश खणकर, प्रशासनातील अधिकारी, विविध पक्षांचे गटनेते आणि शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



मुंबई शहर शिक्षक विकास मंडळाच्या वतीने प्रा. डॉ. विशाल कडणे यांच्या नेतृत्वाखाली यंदा दिवाळीसाठी ३५ हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याची मागणी महापौर रितू तावडे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली होती. महापालिकेची आर्थिक परिस्थिती आणि उपलब्ध संसाधनांचा विचार करून, मागील वर्षाच्या तुलनेत दोन हजार रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार ३३ हजार रुपये सानुग्रह अनुदान जाहीर करण्यात आले. खासगी प्राथमिक शाळांमधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांना महापौरांच्या दालनातील संयुक्त बैठकीत प्रतिनिधित्व मिळाल्याचे संघटनेने नमूद केले. या बैठकीत मुंबई शहर शिक्षक विकास मंडळाच्या प्राथमिक विभागाच्या वतीने कार्याध्यक्ष प्रभाकर दाते आणि सरचिटणीस संदीप परब यांनी कर्मचाऱ्यांच्या मागण्या मांडल्या.

सानुग्रह अनुदानाची रक्कम दिवाळीपूर्वीच कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यांत जमा करावी*, अशी आग्रही मागणी संघटनेच्या प्रतिनिधींनी केली. या मागणीला महापौर, उपमहापौर आणि शिक्षण समितीच्या अध्यक्षांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले. सानुग्रह अनुदानातील वाढीमुळे शिक्षकांच्या दिवाळीचा आनंद द्विगुणित होण्याची अपेक्षा असून, घोषित रक्कम वेळेत मिळावी, हीच कर्मचाऱ्यांची प्रमुख अपेक्षा आहे.

शिक्षकांमध्ये समाधानाचे वातावरण

सानुग्रह अनुदानातील वाढीमुळे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिवाळीच्या खर्चासाठी आर्थिक हातभार मिळणार आहे. कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना प्रशासनापर्यंत पोहोचविण्यासाठी संघटनेने केलेल्या पाठपुराव्याबद्दल शिक्षकवर्गातून समाधान व्यक्त होत आहे. या निर्णयाबद्दल मुंबई शहर शिक्षक विकास मंडळाच्या वतीने महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय घाडी आणि संबंधित पदाधिकाऱ्यांचे आभार मानण्यात आले. तसेच शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसाठी पुढाकार घेतल्याबद्दल प्रा. डॉ. विशाल कडणे यांचेही विशेष आभार व्यक्त करण्यात आले.

'स्त्री'च्या नैसर्गिक सौंदर्याचा आणि आत्मप्रेमाचा उत्सव

■ मुंबई (दै. संध्या)

भारतीय संस्कृतीत साडी आणि शृंगार यांना केवळ सौंदर्याचे नव्हे, तर परंपरा, भावना आणि स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतीक मानले जाते. याच सांस्कृतिक वारशाला आधुनिक स्त्रीच्या आत्मविश्वासाची आणि आत्मप्रेमाची जोड देत टाटा समूहातील टायटन कंपनीचा पारंपरिक पोशाखांचा ब्रँड तनायरा याने सणासुदीच्या निमित्ताने 'सोळा शृंगार' ही खास मोहीम सादर केली आहे. 'Aap se hi poora, har shringaar' या संकल्पनेवर आधारित ही मोहीम प्रत्येक स्त्रीच्या नैसर्गिक सौंदर्याचा, स्वतःकडे कौतुकाने पाहण्याच्या भावनेचा आणि स्वतःच्या आवडीनुसार सजण्याच्या स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करते. भारतीय परंपरेत सोळा शृंगाराला विशेष सांस्कृतिक आणि भावनिक महत्त्व आहे. विविध प्रदेशांतील परंपरा, पिढ्यांनुसार बदलणाऱ्या आवडीनिवडी आणि सजण्याच्या वेगवेगळ्या पद्धती यांमधून स्त्रीचे व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबित होते. आरशासमोर उभे राहून साडीचा पदर नीट करणे, दागिने सावरणे किंवा केसांची रचना व्यवस्थित करणे, हा प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यातील परिचित आणि खासगी क्षण असतो. याच सहज अनुभवाला केंद्रस्थानी ठेवत तनायराची ही मोहीम स्त्रीचे सौंदर्य केवळ बाह्य सजावटीत नसून तिच्या आत्मविश्वासात, व्यक्तिमत्त्वात आणि स्वतःवरील प्रेमातही सामावलेले आहे, हा संदेश देते. 'सोळा शृंगार' या उत्सवी कलेक्शनमध्ये भारतीय वस्त्रपरंपरेतील समृद्ध वारसा आणि आधुनिक स्त्रीच्या फॅशनविषयक जाणिवांचा सुंदर मिलाफ पाहायला मिळतो. आलिशान सिल्क, नाजूक ऑर्गन्झा, आकर्षक टिश्यू आणि पारंपरिक टसर यांसारख्या कापडांपासून तयार केलेल्या साड्यांमध्ये पारंपरिक विणकाम, देखणे नक्षीकाम आणि कुशल कारागिरांच्या उत्कृष्ट हस्तकौशल्याला विशेष महत्त्व देण्यात आले आहे.

'स्त्रीच प्रत्येक शृंगाराचे खरे पूर्णत्व'

टायटन कंपनी लिमिटेडच्या तनायरा ब्रँडचे सीएसएमओ सोमप्रभ सिंग म्हणाले, "साडी हा भारताला जोडणारा सुंदर धागा आहे. विविध प्रदेशांतील आणि पिढ्यांतील स्त्रिया साडीच्या माध्यमातून आपली ओळख आणि वैयक्तिक शैली व्यक्त करतात. 'सोळा शृंगार' कलेक्शनमधून या विविधतेचा उत्सव साजरा करताना स्त्रीलाच प्रत्येक लूकचे खरे पूर्णत्व मानण्यात आले आहे." त्यांच्या या भूमिकेतून तनायराच्या मोहिमेचा मुख्य विचार स्पष्ट होतो. शृंगार हा केवळ इतरांसाठी सजण्याचा भाग नसून स्वतःला आनंद देण्याचा, स्वतःच्या सौंदर्याची जाणीव करून घेण्याचा आणि स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा सन्मान करण्याचा अनुभव आहे.

महिला डॉक्टरांचा 'नवदुर्गा सन्मानपत्र' देऊन गौरव

जनजागृती सेवा संस्थेचा स्तुत्य उपक्रम; रुग्णसेवेतील समर्पणाचा केला सन्मान

■ बदलापूर (दै. संध्या)

'रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा' या उदात्त भावनेतून रुग्णांना आरोग्यसेवा देण्यासाठी अहोरात्र तत्पर असणाऱ्या महिला डॉक्टरांच्या कार्याचा गौरव करत जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने 'नवदुर्गा सन्मानपत्र' प्रदान करून त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. नुकत्याच संपन्न झालेल्या नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून बदलापूर येथील आरोग्य आयुष्मान भारत दवाखान्यात हा प्रेरणादायी उपक्रम उत्साहात पार पडला.



महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागांतर्गत कार्यरत वैद्यकीय अधिकारी डॉ. केतकी गायकवाड, डॉ. प्रियांका राठोड, डॉ. प्रगती भेरे आणि डॉ. हर्षदा बिऱ्हाडे यांना आकर्षक भेटवस्तू, पेन, गुलाबपुष्प आणि 'नवदुर्गा सन्मानपत्र' प्रदान करून गौरविण्यात आले. जनजागृती सेवा संस्थेचे ज्येष्ठ सल्लागार, समता साहित्य अकादमी महाराष्ट्राचे अध्यक्ष तथा राष्ट्रपती पदक सन्मानित दिलीप नारकर यांच्या हस्ते हा सन्मान समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला. स्पर्श हॉस्पिटल, बदलापूर-कर्जत-पनवेल महामार्ग परिसरातील आरोग्य आयुष्मान भारत दवाखान्यात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना दिलीप नारकर म्हणाले, "डॉक्टर हा केवळ एक व्यवसाय नसून तो माणुसकीची सेवा करण्याचा पवित्र धर्म आहे. रुग्णाच्या वेदना समजून घेणे, त्याला योग्य उपचार देणे आणि त्याच्या मनात जगण्याची नवी उमेद निर्माण करणे, ही डॉक्टरांच्या कार्याची खरी महती आहे. विशेषतः महिला डॉक्टर घर, कुटुंब आणि व्यावसायिक जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळत आरोग्यसेवेच्या क्षेत्रात मोलाचे योगदान देत आहेत. अनेकदा प्रतिकूल परिस्थितीतही त्या रुग्णांच्या सेवेसाठी तत्पर असतात. त्यांच्या ज्ञानाला करुणेची जोड आणि कर्तव्याला सेवाभावाची किनार लाभलेली असते. अशा सेवाव्रती डॉक्टरांचा सन्मान करणे म्हणजे समाजातील सेवाभावी वृत्तीचा गौरव करणे होय. नवरात्रोत्सवातील नवदुर्गांच्या प्रेरणेतून या महिला डॉक्टरांच्या कार्याचा गौरव होत आहे, ही आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. त्यांच्या हातून अशीच निरंतर रुग्णसेवा घडत राहो आणि त्यांना पुढील वाटचालीसाठी उत्तम आरोग्य, यश व समाधान लाभो," अशा शब्दांत त्यांनी डॉक्टरांच्या कार्याचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी उपस्थित वैद्यकीय अधिकाऱ्यांना जनजागृती सेवा संस्थेच्या सामाजिक, शैक्षणिक आणि जनहिताच्या कार्याची सविस्तर माहिती दिली. समाजातील विविध क्षेत्रांत निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या योगदानाची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन देणे, हा संस्थेच्या उपक्रमांचा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

निरोगी समाजाच्या निर्मितीसाठी डॉक्टरांचे योगदान अनमोल आहे. रुग्णांना केवळ औषधोपचारच नव्हे, तर मानसिक आधार आणि विश्वास देणाऱ्या डॉक्टरांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने 'नवदुर्गा सन्मानपत्र' उपक्रम राबविण्यात आला. आरोग्यसेवेच्या माध्यमातून समाजाप्रती आपले कर्तव्य निष्ठेने पार पाडणाऱ्या महिला डॉक्टरांचा सन्मान हा त्यांच्या कार्याला नवी प्रेरणा देणारा ठरला.

'विवो इग्नाइट २०२६' अंतर्गत विद्यार्थी सन्मान

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

विवो इंडियाने जाहीर केले की, गुजरातच्या सुरत येथील आरएमजी माहेश्वरी इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी ध्येय शाह हा, इयत्ता ८ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या विवोच्या देशव्यापी तंत्रज्ञान आणि नवकल्पना उपक्रम 'विवो इग्नाइट २०२६' चा राष्ट्रीय विजेता ठरला आहे. ही या उपक्रमाची चौथी आवृत्ती आहे. त्याचा 'जलकार - द शेप ऑफ वॉटर: प्रेडिक्ट, अलर्ट, अँड ॲक्ट' हा प्रकल्प, भूजल उपलब्धतेचा अंदाज घेण्यासाठी मशीन-लर्निंग तंत्रज्ञान आणि भूजलाच्या ऐतिहासिक माहितीचा वापर करतो, ज्यामुळे जल व्यवस्थापन सुधारण्यास मदत होते. २८ ऑक्टोबर रोजी नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित 'विवो इग्नाइट २०२६' च्या राष्ट्रीय अंतिम सोहळ्यात विजेत्यांची घोषणा करण्यात आली. तरुण नवोन्मेषकांच्या सर्वोत्कृष्ट १० प्रकल्पांचा सन्मान करण्यात आला, ज्यांनी वास्तविक जगातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी त्यांची सर्जनशीलता, वैज्ञानिक विचार आणि समस्या सोडवण्याची कौशल्ये प्रदर्शित केली. अंतिम फेरीत १३ तरुण नवोन्मेषकांचा समावेश होता, ज्यांनी आठ वैयक्तिक आणि दोन गट प्रकल्पांद्वारे उपाय सादर केले. या उपायांमध्ये भूजल संवर्धन, जल सुरक्षा, महिलांची ऑनलाइन सुरक्षा, रस्ते सुरक्षा आणि सहाय्यक तंत्रज्ञान या विषयांचा समावेश होता. हा कार्यक्रम ₹३५ लाख पर्यंतच्या शैक्षणिक शिष्यवृत्ती आणि पारितोषिके प्रदान करतो. या चौथ्या आवृत्तीत १२,००० हून अधिक शाळांमधून ३८,००० हून अधिक नोंदणी झाली आणि विद्यार्थ्यांनी ६,१०० हून अधिक नाविन्यपूर्ण कल्पना सादर केल्या. यात २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेशांमधील ७०५ जिल्ह्यांतील ४,५०० हून अधिक शहरांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, ज्यात ९२ महत्त्वाकांक्षी जिल्ह्यांचा समावेश होता. व्हिवो इंडियाच्या मुख्य कॉर्पोरेट कम्युनिकेशन अधिकारी, गीताज चन्ना म्हणाल्या, "आम्ही व्हिवो इग्नाइट २०२६ ची राष्ट्रीय विजेती ध्येय शाह आणि टॉप १० अंतिम स्पर्धकांचे त्यांच्या उत्कृष्ट नवोपक्रमाबद्दल अभिनंदन करतो. चौथ्या आवृत्तीच्या समाप्तीनंतर, ७०५ जिल्ह्यांमधील १२,००० हून अधिक शाळांचा वाढता सहभाग हे सिद्ध करतो की व्हिवो इग्नाइटमध्ये भारतातील सर्वात मोठ्या शालेय स्तरावरील STEM नवोपक्रम मंचांपैकी एक बनण्याची क्षमता आहे. विशेषतः सरकारी शाळा आणि महत्त्वाकांक्षी जिल्ह्यांमध्ये आमची पोहोच वाढवून ही गती आणखी वाढवण्याचे आमचे ध्येय आहे. आम्हाला मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पना वर्गाबाहेर नेण्यासाठी संधी अधिक मजबूत करायच्या आहेत. व्हिवो इग्नाइटला भारतातील सर्वात विश्वासार्ह शालेय स्तरावरील नवोपक्रम मंच बनवायचे आहे, जो तरुण मनांना त्यांच्या कल्पनांना अर्थपूर्ण उपायांमध्ये रूपांतरित करण्यासाठी आणि भारताच्या दीर्घकालीन नवोपक्रम ध्येयांमध्ये योगदान देण्यासाठी सक्षम करेल." राष्ट्रीय अंतिम सोहळ्यात अंतिम स्पर्धकांच्या कामगिरीला मान्यता देण्यासाठी विद्यार्थी नवोन्मेषक, शिक्षक, कार्यक्रम भागीदार आणि इतर हितधारक एकत्र आले होते. या कार्यक्रमाला भारत सरकारच्या MeitY स्टार्टअप हबचे सीईओ डॉ. पनीरसेल्वम मदनगोपाल; UNGC NI चे कार्यकारी संचालक श्री. रत्नेश झा; आयआयटी मद्रासच्या टेक्नॉलॉजी इनोव्हेशन हबचे (TIH) सीईओ डॉ. एम. जे. शंकर रमण; आणि IITM प्रवर्तक टेक्नॉलॉजीज फाउंडेशनचे सीईओ डॉ. एम. जे. शंकर रमण उपस्थित होते; आणि भारताचे 'टेक गुरू' राजीव मखानी यांनी याचे आयोजन केले होते. समारंभाचा एक भाग म्हणून, व्हिवो इंडियाने नॅशनल टीचर इनोव्हेशन फेलोशिप (NTIF) अंतर्गत निवडलेल्या १० शिक्षकांचा सन्मान केला.



हा व्हिवो इग्नाइटचाच एक विस्तार आहे, जो STEM शिक्षणातील नाविन्यपूर्ण दृष्टिकोनांना मान्यता देतो. १४ राज्ये आणि २६ जिल्ह्यांमधून आलेल्या २०० हून अधिक अर्जांमधून निवडलेल्या या शिक्षकांना, विज्ञान आणि तंत्रज्ञान शिक्षण विद्यार्थ्यांसाठी अधिक व्यावहारिक, सर्वसमावेशक आणि आकर्षक बनवण्याच्या त्यांच्या प्रयत्नांसाठी सन्मानित करण्यात आले.

देशात प्रथमच बॅटरीद्वारे १००० मेगावॅट वीजपुरवठा; महावितरणचे यश



■ मुंबई (दै. संध्या)

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठीच्या सौरऊर्जानिर्मिती योजनेत निर्माण झालेली अतिरिक्त वीज तसेच ग्रीडद्वारे उपलब्ध स्वस्त सौरऊर्जा बॅटरीमध्ये साठवून सायंकाळी मोठ्या वीज मागणीच्या वेळी वापरण्यासाठी महावितरणने १००० मेगावॅट अवरचा टप्पा गाठला आहे. देशात प्रथमच विकेंद्रित स्वरुपात बॅटरीचा वापर करून इतका मोठ्या प्रमाणात वीज पुरवठा करण्यात येत असून राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे वाढलेल्या वीजमागणीच्या काळात हा वीजपुरवठा अत्यंत उपयुक्त ठरला आहे, अशी माहिती मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली. त्यांनी सांगितले की, मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही गेमचेंजर योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत आतापर्यंत सुमारे ७ हजार मेगावॅट क्षमतेचे विकेंद्रित सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प सुरू झाले आहेत. या प्रकल्पांमधून निर्माण होणारी वीज कृषीपंपांना देण्यात येते. अतिरिक्त वीज बॅटरीमध्ये साठवून सायंकाळी कमाल वीज मागणीच्या वेळी देण्यासाठी महावितरणने सुरु केलेल्या बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टिम (बीईएसएस) योजनेत ५०० मेगावॅट क्षमतेची बॅटरी साठवणूक क्षमता नुकतीच कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यातून दोन तास वीजपुरवठा होणार असल्याने १००० मेगावॅट अवर इतकी बीईएसएस क्षमता उपलब्ध झाली आहे. मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार सुरू झालेल्या बॅटरी स्टोरेज योजनेतून सर्वच वीजग्राहकांना लाभ होत आहे. एल निनोच्या प्रभावामुळे पाऊस कमी झाला असून त्यामुळे ऑक्टोबर महिन्यात उष्णतेच्या झळा अधिक जाणवत आहेत. परिणामी विजेची उच्चांकी मागणी होत आहे. सौरऊर्जेमुळे दिवसा पुरेसा व किफायतशीर दरात वीजपुरवठा होत आहे. सायंकाळी सौरऊर्जेचा पुरवठा बंद झाल्यानंतर वीज पुरवठा करण्यासाठी अधिक दराने वीज विकत घ्यावी लागते. अशा स्थितीत महावितरणच्या पुढाकाराने सुरू झालेल्या १००० मेगावॅट अवर क्षमतेच्या बॅटरी स्टोरेज प्रकल्पामुळे दिलासा मिळू लागला आहे.



पिंपरी-चिंचवड आणि परिसर
शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर २०२६
दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक


थोडक्यात पण महत्वाचे




लक्षवेध सोशल फाउंडेशनतर्फे महिला भोंडला व सन्मान सोहळा उत्साहात

मोशी : दैनिक संध्या

लक्षवेध सोशल फाउंडेशनच्या वतीने प्रा. सौ. कविता संदेश आल्हाट यांच्या पुढाकारातून प्रावी महिला बचत गटातील महिलांसाठी भोंडला व सन्मान सोहळ्याचे आयोजन श्री गणेश लॉन्स, भारतमाता चौक, मोशी येथे करण्यात आले. या कार्यक्रमाचे नियोजन प्रावी ड्राइविंग स्कूल च्या अध्यक्ष प्रविणा पिल्लई यांनी केले. महिलांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळावे, त्यांच्या कलेला प्रोत्साहन मिळावे आणि पारंपरिक संस्कृतीचे जतन व्हावे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. यावेळी बचत गटातील महिलांचा सन्मान करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. यावेळी पाहुणे म्हणून ज्यांची प्रमुख उपस्थिती पिंपरी चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्याध्यक्षा कविता खराडे, उन्मेष फाउंडेशन अध्यक्ष राखी धर, तसेच मोशी गावातील मनीषा गव्हाणे, ज्योती आल्हाट, आशा मिसाळ, संध्या गावडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. महिला सक्षमीकरण, स्वावलंबन आणि महिलांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी लक्षवेध सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून असे उपक्रम सातत्याने राबविण्याचा संकल्प आयोजक प्रा. सौ. कविता संदेश आल्हाट यांनी व्यक्त केला.





चिंचवडमध्ये मध्यरात्री भीषण आग

पिंपरी : दैनिक संध्या

चिंचवड गावातील कुणाल मार्केटच्या पार्किंगमध्ये मध्यरात्री दोनच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीत १७ दुचाकी आणि ४ चारचाकी अशा एकूण २१ वाहनांचा जळून कोळसा झाला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी जवानांनी शर्थीचे प्रयत्न केले. दरम्यान, आगीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत इमारतीच्या टेरेसवर १० नागरिक अडकले होते. अग्निशमन दलाच्या जवानांनी तत्परता दाखवत या सर्व नागरिकांची सुखरूप सुटका केली. जवानांच्या प्रयत्नांमुळे संभाव्य जीवितहानी टळली. या दुर्घटनेत एक व्यक्ती जखमी झाला असल्याची माहिती आहे. मात्र, आगीत २१ वाहने जळून खाक झाल्याने वाहनमालकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. दरम्यान, ही आग नेमकी कशामुळे लागली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. आगीच्या कारणाचा शोध घेण्यासाठी पोलीस आणि अग्निशमन दलाकडून पुढील तपास सुरू आहे.

भाजपकडून अनुशासन समितीची घोषणा; खाडे, आमदार खापरे, ॲड. शेडगे यांच्यासह सहा जणांचा समितीत समावेश

पिंपरी: दैनिक संध्या

भारतीय जनता पार्टीच्या पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा संघटनेतील शिस्त व अनुशासन अधिक बळकट करण्यासाठी शहर जिल्हा अनुशासन समितीची घोषणा करण्यात आली आहे. भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी या समितीतील सदस्यांची नावे जाहीर केली. पक्ष संघटनेचे काम सुरळीत चालावे, संघटनेचा योग्य विस्तार व्हावा आणि निवडणुकीच्या काळात कार्यकर्त्यांनी खोट्या बातम्या व प्रचाराला बळी न पडता पक्षाचे काम करावे, या उद्देशाने अनुशासन समिती स्थापन करण्यात आली आहे. पक्षांतर्गत शिस्त व अनुशासन ही भाजपची ओळख असून, ती अधिक बळकट करून संघटना मजबूत करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे शहराध्यक्षांनी स्पष्ट केले. या समितीमध्ये पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते, ज्येष्ठ विधिज्ञ, लोकप्रतिनिधी तसेच पक्ष संघटनेत दीर्घकाळ काम करण्याचा अनुभव असलेल्या कार्यकर्त्यांचा समावेश करण्यात आला आहे. अनुशासन समितीचे सदस्य खालीलप्रमाणे : सदाशिव दादासाहेब खाडे आमदार उमा गिरीश खापरे ॲड. मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे ॲड. गोरखनाथ गेनबा झोळ प्रशांत कृष्णराव शितोळे विकास हरिश्चंद्र डोळस या समितीच्या माध्यमातून पक्षांतर्गत शिस्त, संघटनात्मक समन्वय आणि पक्षाच्या कार्यपद्धतीला अधिक बळकटी देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

रावेतमधील 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाला नगरसेविका ऐश्वर्या तरस यांचा तीव्र विरोध

पिंपरी: दैनिक संध्या

रावेत परिसरातील सेक्टर २३ मधील सर्वे क्रमांक १५५, १५६, १५८ आणि १७७ येथे प्रस्तावित असलेल्या 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाला नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस यांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. या प्रकल्पामुळे नागरिकांच्या आरोग्यावर, पर्यावरणावर आणि परिसराच्या सुरक्षेवर संभाव्य परिणाम होऊ शकतात, अशी भूमिका मांडत त्यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त विजय सूर्यवंशी यांना निवेदन दिले आहे. तसेच, या प्रस्तावाचा पुनर्विचार करून प्रकल्प रद्द करण्याची मागणी केली आहे. रावेत परिसरात नवीन 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव माध्यमांद्वारे समोर आल्यानंतर प्रभाग क्रमांक १६ मधील नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन आपण या प्रकल्पाला ठाम विरोध करीत असल्याचे तरस यांनी निवेदनात नमूद केले आहे. मोशी येथे उभारण्यात आलेला वेस्ट टू एनर्जी प्रकल्प अद्याप अपेक्षित क्षमतेने आणि कार्यक्षमतेने सुरू झालेला नसल्याचा दावा ऐश्वर्या तरस यांनी केला आहे. या प्रकल्पातील तांत्रिक अडचणी, कार्यप्रणालीतील त्रुटी, पर्यावरणीय परिणाम आणि कचरा व्यवस्थापनासंबंधीचे प्रश्न पूर्णपणे सुटलेले नसताना दुसरा प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेणे योग्य नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. आधी मोशीतील प्रकल्पातील अडचणी दूर करून तो पूर्ण क्षमतेने, सुरक्षित आणि कार्यक्षम पद्धतीने सुरू करावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे. प्रस्तावित प्रकल्पाच्या परिसरात संरक्षण मंत्रालयाच्या अखत्यारीतील देहूरोड ऑर्डनन्स फॅक्टरी असल्याचे नमूद करत तरस यांनी राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा उपस्थित केला आहे. हा परिसर संवेदनशील असल्याने प्रकल्प उभारण्यापूर्वी संरक्षण विभागाची भूमिका, सुरक्षा मानके आणि संभाव्य धोक्यांचा सखोल अभ्यास करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रस्तावित प्रकल्पाच्या आसपास ऐतिहासिक दुर्गा टेकडी, वाढत्या निवासी वसाहती, शैक्षणिक संस्था आणि मोठ्या प्रमाणात लोकवस्ती आहे.

जंजिरा किल्ल्यावर शिवरायांचा पुतळा उभारण्यासाठी टाळाटाळ

मनोज जरांगे यांच्या तोंडाला काळे फासणार : भरतभाऊ ओव्हाळ

■ पिंपरी-चिंचवड (दै. संध्या)

जंजिरा किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यासाठी प्रयत्न करावेत, या मागणीचे निवेदन अडीच वर्षांपूर्वी मनोज जरांगे पाटील यांना देण्यात आले होते. त्याला त्यांनी दुजेरा देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पीएला कॉलवर संपर्क साधला होता आणि पुतळा उभारण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु आजपर्यंत या विषयावर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसून त्यांनी दोन दिवसात त्यांची भूमिका यावर जाहीर केली नाही तर त्यांच्या तोंडाला काळे फासण्याचा इशारा शिवभीम सेनेचे संस्थापक अध्यक्ष भरतभाऊ ओव्हाळ यांनी दिला आहे. प्रसिद्धी माध्यमांसोबत बोलताना ओव्हाळ यांनी म्हटले आहे की, जंजिरा किल्ल्यावर शिवरायांचा पुतळा उभारण्याच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांना निवेदन दिले होते. त्यांनी या विषयावर आश्वासन दिले होते;जरांगे पाटील हे विविध राजकीय आणि सामाजिक विषयांवर आंदोलनासाठी पुढाकार घेतात. जुन्नर आणि भीमाशंकर येथे जाण्यासाठी त्यांच्याकडे वेळ आहे. विविध विषयांवर आंदोलन करण्यासाठीही ते पुढे येतात. मात्र, जंजिरा किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याच्या विषयाकडे दुर्लक्ष का केले जात आहे. पुतळा उभारू नये म्हणून मुस्लिम समाजाकडून पैसे घेतले आहेत का? नाही हे माध्यमांसमोर सांगावे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून जंजिरा किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याचा विषय चांगला असून तो हाती घेण्याची गरज असल्याचे



त्यांनी सांगितले होते.जर हा विषय महत्त्वाचा वाटत नसेल तर तसे त्यांनी जाहीर करावे.मनोज जरांगे पाटील हे मुंबईच्या दिशेने आंदोलनासाठी जात असताना शिवभीम सेनेने त्यांना जाहीर पाठिंबा दिला होता. त्यांच्या आंदोलनाला चांगल्या कामासाठी पाठिंबा दिला असताना, जंजिरा किल्ल्यावरील पुतळ्याच्या मागणीच्या बाबतीत आमच्याकडे दुर्लक्ष का केले जात आहे. या विषयावर जरांगे पाटील यांनी माध्यमांसमोर येऊन आपली भूमिका दोन दिवसांत स्पष्ट करावी आणि समाजाची दिशाभूल करू नये अन्यथा अंतरवाली सराटी येथे येऊन तोंडाला काळे फासल्याशिवाय राहणार नाही. ते मराठा समाजाची दिशाभूल करत असून त्यांच्या भूमिकेवर कोणाचाही विश्वास राहिलेला नाही.कोणाच्या तरी सांगण्यावरून काम करत असून कोणाच्या प्रभावाखाली काम करतात, त्यांचे मार्गदर्शक कोण आहेत? हे बघणे गरजेचे आहे. ते रोबोटसारखे काम करत असून कुणीतरी सांगितल्यावर ते चालतात आणि कुणीतरी सांगितल्यावर थांबतात. त्यांच्यासोबत असणारे सहकारी हे टेंडर धार्जिणे असून जरांगे हे त्यांचे प्रमुख आहेत. दोन दिवसात उत्तर न दिल्यास अंतरवाली सराटी येथे जाऊन जरांगे यांना काळे फासण्याचा इशारा देत "ही धमकी समजायची की इशारा, हे मनोज जरांगे पाटील यांनी ठरवावे, असेही ओव्हाळ यांनी म्हटले आहे.

कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांच्या वतीने कामगारांच्या मागण्यांसाठी "विनम्र अभियान पदयात्रा"

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये सर्व विभागात काम करत असलेल्या कंत्राटी पद्धतीवर दाखवण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या परिवारात दिवाळी साजरी करण्याकरता दिनांक 3 नोव्हेंबर 2026 पूर्वी बोनस कायद्यानुसार सन 2025-2026 या वर्षाचा बोनस व ऑक्टोबर 2026 या महिन्यातील वेतन देण्यात यावे या मागणीसाठी उद्या गुरुवार दिनांक २९ ऑक्टोबर २०२६ रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते पिंपरी चिंचवड महानगरपालिका अशी "विनम्र अभियान पदयात्रा" राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे संस्थापक अध्यक्ष कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांच्या वतीने काढण्यात येणार आहे.



यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवी लांडगे आणि आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन देण्यात येणार आहे.

कामगार नेते यशवंतभाऊ भोसले म्हणाले की,पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये सर्व विभागांमध्ये कंत्राटी पद्धतीवर दाखवण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना उदाहरणार्थ आरोग्य विभागातील सफाई कर्मचारी वाहन चालक वैद्यकीय मधील स्वच्छता सेवक,वार्ड बॉय,नर्सेस, तांत्रिक कर्मचारी तसेच वैद्यकीय अधिकारी उद्यान विभाग मधील कर्मचारी, अग्निशमन विभागातील वाहनचालक व अग्निशमन कर्मचारी, पालिकेच्या सर्व शाळांमधील स्वच्छता सेवक शिपाई व इतर कर्मचारी, स्मशानामधील सर्व कर्मचारी, पाणीपुरवठा व जलवाहिनी विभाग मधील सर्व कर्मचारी सर्व प्रभागांमध्ये काम करणारे कंत्राटी पद्धतीवर दाखवण्यात आलेल्या सुमारे 4500 कर्मचाऱ्यांच्या समान काम समान वेतन,महापालिकेने रक्कम रुपये पाच लाखापर्यंतचा परिवारासह विमा उतरवणे,कर्मचाऱ्याचा अपघाती अथवा आजारी पडून मृत्यू झाल्यास वारसदारास रक्कम रुपये 25 लाख भरपाई पोटी देण्यात यावेत,अनुकंपा तत्वावर वारसदार यासमहापालिकेत नोकरी देण्यात यावी या कायदेशीर मागण्यांना मान्यता द्यावी.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कामकाजाला गती मिळणार?

■ पिंपरी (दै. संध्या)



पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदार संघाची निवडणूक जाहीर झाल्यापासून 22 सप्टेंबर ते 28 ऑक्टोबरपर्यंत पिंपरी-चिंचवड महापालिकेत आचारसंहिता लागू करण्यात आली होती. त्यामुळे सर्वसाधारण सभेसह स्थायी समिती व विविध विषय समितीच्या सभा होत नसल्याने महिनाभर महापालिकेचे दैनंदिन कामकाज ठप्प झाले होते. आचारसंहिता गुरुवार (दि.29) संपणार असल्याने त्या दिवसापासून महापालिकेचे कामकाज सुरळीत चालेल, अशी अपेक्षा नागरिकांसह, सामाजिक कार्यकर्ते व नगरसेवकांकडून व्यक्त केली जात आहे.

पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी 22 सप्टेंबरपासून महापालिकेत आचारसंहिता लागू झाली होती. त्यामुळे महापौर रवी लांडगे यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांची वाहने काढून घेण्यात आली. आचारसंहितेमुळे सर्वसाधारण सभा, स्थायी समिती आणि विविध विषय समितीच्या सभेचा कामकाज ठप्प झाले होते. कामे होत नसल्याने नागरिकांसह सामाजिक कार्यकर्ते व नगरसेवक वैतागले होते. अनेक निर्णय सभा होत नसल्याने अडकून पडले होते. आचारसंहिता महिन्याभरानंतर गुरूवारी संपणार असल्याने महापालिकेचे दैनंदिन कामकाज सुरळीत सुरू होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधान परिषदेच्या निवडणुकीची आचारसंहिता मे व जून महिन्यात लागली होती. त्यामुळे महापालिकेचे कामकाज ठप्प झाले होते.

पीएमआरडीएचा मोठा निर्णय!

झोन प्रमाणपत्रासह तीन महत्त्वाची कागदपत्रे आता ऑनलाइन

■ पिंपरी(दै. संध्या)

नागरिकांना जलद, पारदर्शक शासकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी पीएमआरडीए एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. 'पीएमआरडीए'ने जीआयएस-आधारित जिओपोर्टल विकसित केले आहे. या पोर्टलद्वारे 'झोन प्रमाणपत्र', 'पार्ट प्लॅन' आणि 'साईट एलिव्हेशन प्रमाणपत्र' आता स्वयंचलित पद्धतीने ऑनलाइन उपलब्ध होणार आहेत. या सुविधेमुळे नागरिकांना पीएमआरडीए कार्यालयात वारंवार जाण्याचा आणि पाठपुरावा करण्याचा त्रासातून सुटका होणार आहे. पूर्वी प्रादेशिक योजनांच्या कागदी नकाशांची प्रत्यक्ष तपासणी करावी लागत असे आणि प्रत्येक प्रक्रियेसाठी अनेक दिवस प्रतीक्षा करावी लागत असे. मात्र, पीएमआरडीएने ही तीनही महत्त्वाची प्रमाणपत्रे ऑनलाइन उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार जीआयएस-आधारित जिओपोर्टल विकसित करण्यात आले असून, त्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.



पूर्वी झोन प्रमाणपत्र मिळवण्यासाठी सात दिवस, पार्ट प्लानसाठी तीन दिवस, तर साईट एलिव्हेशन प्रमाणपत्रासाठी उंची आणि भौगोलिक स्थितीची तपासणी करण्यासाठी तब्बल दहा दिवस लागत असत; मात्र 'पीएमआरडीए'ने सन १९९७ मध्ये मंजूर झालेल्या पुणे प्रादेशिक योजनेचे (आरपी) डिजिटायझेशन करून ती जीआयएस प्रणालीमध्ये समाविष्ट केली आहे. तसेच, डिजिटल एलिव्हेशन मॉडेल, टोपोशीट्स आणि आधुनिक भौगोलिक माहितीचा वापर करून साईट एलिव्हेशन प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया मानवी हस्तक्षेपाशिवाय पूर्णपणे स्वयंचलित केली आहे. नागरिकांना झोन प्रमाणपत्रासोबत पार्ट प्लानदेखील मिळणार आहे. त्यामुळे ही सर्व प्रमाणपत्रे आता ऑनलाइन आणि तात्काळ उपलब्ध होणार आहेत.

दिवाळीत गावी जाणे महागले! खासगी बसच्या तिकीट दरात दुप्पट ते तिप्पट वाढ

■ चिंचवड (दै. संध्या)

दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये गावी जाण्यासाठी पुणे आणि पिंपरी चिंचवडमधील नागरिकांची लगबग सुरू झाली असतानाच खासगी बस आणि ट्रॅव्हलच्या तिकीट दरात दुप्पट वाढ झाली आहे. यामुळे पिंपरी चिंचवड शहरातून मूळ गावी जाणाऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे. प्रवासाचे अंतर, बसचा प्रकार आणि मागणीनुसार तिकीटाची दर बदलत आहेत. विशेषतः एकाच कुटुंबातील चार-पाच सदस्यांना प्रवासासाठी मोठी रक्कम खर्च करावी लागत आहे. खासगी वाहने भाड्याने घेतानाही इंधन, टोल आणि चालकाचे मानधन यामुळे खर्च वाढला आहे. महागाईच्या काळात फराळ, कपडे आणि इतर सणखर्चात प्रवाशांच्या वाढीव खर्चाची भर पडल्याने कमी उत्पन्न गटातील कामगारांना गावी जाणे कठीण झाले आहे. दिवाळीत ऐनवेळी गावी जाणाऱ्या प्रवाशांना रेल्वेचे तिकीट मिळत नाही. त्यामुळे अशा प्रवाशांसाठी खासगी बस



हा एकमेव पर्याय आहे. पुण्यात नोकरी, शिक्षण आणि व्यवसायनिमित्त बाहेरच्या राज्यातील आणि जिल्ह्यातील वास्तवात असलेले अनेक नागरिक दिवाळीसाठी आपल्या गावी जातात. त्यामुळे खान्देश, मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रकडे जाणाऱ्या बसेसना मोठी मागणी असते. शिवाय रेल्वे गाड्यांचे आरक्षण दोन महिने आधीच फुल झाल्याने व एसटी आरक्षण उपलब्ध नसल्याने प्रवाशांचा भार वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिक खासगी बस व ट्रॅव्हल्सचा पर्याय निवडतात. पिंपरी- चिंचवड ते परभणी, नांदेड, जालना, अमरावती, नागपूर, भंडारा प्रवाशांसाठी ३००० ते ३५०० रुपये तिकीट दर आकारले जात असल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर आरटीओने ऑनलाइन तिकीट बुकिंग, प्लॅटफॉर्म आणि खासगी बसचालकांच्या भाडे आकारणीवर लक्ष केंद्रित केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार खासगी कंत्राटी प्रवासी वाहनांना संबंधित मार्गावरील एसटीच्या नियमित भाड्याच्या दीडपटापेक्षा अधिक भाडे आकारता येणार नाही.

या मर्यादितचे उल्लंघन करून जादा दर आकारल्यास संबंधी विरुद्ध कारवाई केली जाऊ शकते. एस. टी. महामंडळाकडून निश्चित करण्यात आलेल्या भाडेदाराच्या आधारे खासगी बसचे कमाल भाडे निश्चित करण्याबाबत आरटीओने सूचना दिल्या आहेत. दिवाळीच्या काळात खासगी बचालकाकडून जादा भाडे आकारले जात असल्याच्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर २४ ऑक्टोंबर ते २० नोव्हेंबर या कालावधीत विशेष तपासणी मोहीम राबवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

दिशा उपक्रमांतर्गत स्ट्रीट फुटबॉल स्पर्धेचे आयोजन; बीबीएमएफसी संघाचा विजेतेपदावर कब्जा

■ पिंपरी-चिंचवड (दै. संध्या)

पिंपरी - चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या विशेष बाल पथक विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'दिशा' उपक्रमाच्या माध्यमातून तसेच संदेश बोर्डे स्पोर्ट्स फाउंडेशन आणि पिंपरी-चिंचवड पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने स्ट्रीट फुटबॉल स्पर्धेचे आयोजन डॉ. हेडगेवार क्रीडा संकुल, पिंपरी येथे करण्यात आले. या स्पर्धेत बी बी एम एफ सी संघाने अटीतटीच्या अंतिम सामन्यात १-० गोल करत विजेतेपद पटकावले. रायसींग स्टार पिंपरी संघ उपविजेता ठरला. यूनिवर्सल यूनाइटेड निगडी संघाला फेयर प्ले तर माईटी स्टोर्मस संघाला बेस्ट टीम चे पारितोषिक देण्यात आले.



पिंपरी-चिंचवड शहरातील झोपडपट्टी व वंचित वस्त्यांमधील मुलांना एकत्र आणून त्यांना खेळाची संधी उपलब्ध करून देणे, त्यांच्यातील क्रीडागुणांना वाव देणे आणि त्यांना सकारात्मक दिशेने वाटचाल करण्यासाठी प्रोत्साहित करणे, हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता.

संदेश बोर्डे स्पोर्ट्स फाउंडेशन आणि 'दिशा' उपक्रमाच्या माध्यमातून गेल्या काही वर्षांपासून पिंपरी-चिंचवड शहरातील विविध पोलीस ठाण्यांच्या परिसरातील मुलांना एकत्र आणून त्यांचे समुपदेशन केले जाते. तसेच प्रशिक्षित क्रीडा प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली त्यांना विविध खेळांचे प्रशिक्षण दिले जाते. खेळाच्या माध्यमातून मुलांमध्ये शिस्त, आत्मविश्वास, संघभावना आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याचा या उपक्रमाचा प्रयत्न आहे.या स्पर्धेचे उद्घाटन पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे (IPS) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत निवड झालेल्या पॉल फलेरो यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी संदेश बोर्डे यांनी स्पोर्ट्स फाउंडेशनच्या माध्यमातून घडलेल्या यशोगाथांची माहिती दिली. क्रिडा विकास संस्था नागपूर ह्यांचे ह्या वर्षी झोपडपट्टी फुटबॉल स्पर्धेचे 25 वर्ष पूर्ण झाले हे नमूद केले. योग्य मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि संधी मिळाल्यास वंचित घटकांतील मुलेही क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवू शकतात, हे त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमाला मा.पोलीस आयुक्त श्री विनय कुमार चोबे सो पिंपरी चिंचवड मा. अपर पोलीस आयुक्त श्री. बसवराज तेली सो प्रादेशिक विभाग पोलीस उपायुक्त गुन्हे श्री रोहिदास पवार सो पोलीस उपायुक्त परिमंडळ 01 श्री संदीप आटोळे सो सहाय्यक पोलीस आयुक्त श्री डॉ. सुदर्शन राठोड सहाय्यक पोलीस आयुक्त सांगवी विभाग मनीषा कदम मॅडम व विशेष बाल पोलीस पथकातील अमलदार, दिशा उपक्रम अंतर्गत 24 पोलीस स्टेशन कडील एकूण 24 अधिकारी 29 अंमलदार तसेच 245 बालके तसेच क्रीडा प्रशिक्षक नाझीर सय्यद. सुमित जगधने, स्वप्निल गायकवाड, जाबिर पाशा, शमशाद सिद्दीकी, पूनम देवकाते, अलका रखते, डिम्पल चौधरी, तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

देशासाठी उत्कृष्ट खेळाडू घडतील

यावेळी पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी उपस्थित विद्यार्थी खेळाडूंना मार्गदर्शन केले. खेळाडूंनी नियमित व्यायाम करावा, योग्य आहार घ्यावा, चांगल्या सवयी अंगीकाराव्यात आणि खेळाकडे सातत्याने लक्ष द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. अशा स्पर्धांमध्ये अधिकाधिक मुलांनी सहभागी होऊन आपल्या जीवनाला योग्य दिशा द्यावी. या माध्यमातून राज्यासाठी आणि देशासाठी उत्कृष्ट खेळाडू घडतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

जेजुरी रेल्वे स्थानकावर जनसंवाद यात्रा, लांब पल्ल्याच्या गाड्यांच्या थांब्यासाठी प्रवाशांचा आग्रह!

■ पुरंदर (दै. संध्या)

महाराष्ट्राचे कुलदैवत आणि लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या जेजुरीच्या ब्रिटिशकालीन रेल्वे स्थानकात भारतीय रेल्वे प्रशासनाच्या वतीने नुकत्याच जनसंवाद यात्रेचे आयोजन करण्यात आले. या यात्रेदरम्यान जेजुरी पंचक्रोशीतील प्रवासी संघटना, स्थानिक नागरिक आणि रेल्वे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांमध्ये स्थानकातील विविध समस्या, प्रवाशांच्या सुविधा आणि लांब पल्ल्याच्या रेल्वे गाड्यांच्या थांब्याबाबत सविस्तर चर्चा झाली. जेजुरी हे धार्मिक तीर्थक्षेत्र तसेच औद्योगिक नगरी असल्याने येथून धावणाऱ्या लांब पल्ल्याच्या रेल्वे गाड्यांना थांबा मिळणे अत्यावश्यक असल्याची आग्रही मागणी यावेळी करण्यात आली.

जेजुरी रेल्वे स्थानकातून दररोज मोठ्या प्रमाणावर प्रवासी ये-जा करतात. खंडोबा मंदिरात दर्शनासाठी येणारे भाविक, औद्योगिक क्षेत्रातील कामगार, व्यावसायिक आणि दूरवरून येणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठी आहे. मात्र, लांब पल्ल्याच्या अनेक रेल्वे गाड्यांना जेजुरीत थांबा नसल्याने प्रवाशांना पुणे किंवा सातारा येथे उतरून पुढील प्रवास करावा लागतो. त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांचा अतिरिक्त भार प्रवाशांवर पडत आहे. ही गैरसोय दूर करण्यासाठी जेजुरी रेल्वे स्थानकातून धावणाऱ्या महत्त्वाच्या लांब पल्ल्याच्या गाड्यांना थांबा देण्याची मागणी प्रवासी संघटनांनी केली.

जनसंवाद यात्रेदरम्यान रेल्वे स्थानकाचे सुशोभीकरण, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची व्यवस्था, दोन्ही फलाटांवरील मूलभूत सुविधा, दिव्यांग प्रवाशांसाठी विशेष सोयी आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या प्रश्नांवर चर्चा झाली. जेजुरी हे आंतरराज्यीय भाविकांचे महत्त्वाचे



रेल्वे रोको आंदोलनाचा इशारा

रेल्वे गाड्यांना थांबा देणे आणि जेजुरीच्या नावाने रेल्वे गाडी सुरू करण्याच्या मागण्यांकडे गेल्या पंधरा वर्षांपासून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप प्रवासी संघटनेचे अध्यक्ष विजय खोमणे यांनी केला. या मागण्यांची गांभीर्याने दखल न घेतल्यास नाईलाजाने रेल्वे रोको आंदोलन छेडावे लागेल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

मोठी गर्दी होते. या पार्श्वभूमीवर रेल्वे स्थानकाची क्षमता, प्रवाशांची सुरक्षितता किंवा 'मल्हार सागर एक्सप्रेस' असे नाव देण्यात यावे, अशी मागणी गेल्या पंधरा वर्षांपासून करण्यात येत असल्याचे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष विजय खोमणे यांनी सांगितले.

जेजुरी पंचक्रोशीतील प्रवासी संघटना, शहरातील लोकप्रतिनिधी, श्री मार्तंड देवस्थान समिती, ग्रामस्थ, मानकरी, खांदेकरी, गुरव-पुजारी आणि सेवेकरी वर्गासह विविध सामाजिक संघटनांनी यासंदर्भात निवेदने दिली आहेत. मुंबई, नाशिक, रायगड, कोल्हापूर, पनवेल, उरण आणि अलिबाग परिसरातील जेजुरीच्या भाविकांकडूनही या मागणीला पाठिंबा मिळत असल्याचे सांगण्यात आले.याशिवाय, जेजुरीच्या धार्मिक व औद्योगिक महत्त्वाचा विचार करून वंदे भारत एक्सप्रेससह योग्य त्या लांब पल्ल्याच्या गाड्यांना जेजुरीत थांबा देण्याची मागणीही करण्यात आली. भारतीय रेल्वे प्रशासनाच्या जनसंवाद यात्रेत रेल्वे अधिकारी राकेश कुमार शर्मा, जेजुरी रेल्वे स्थानक व्यवस्थापक संजू प्रसाद जैस्वाल, रेल्वे पीएसआय अशोककुमार धनकड, कॉन्स्टेबल नेत्राम मीना आणि रेल्वे कर्मचारी फ्रँकी पोप उपस्थित होते. यावेळी जेजुरी रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष विजय खोमणे, संघटनेचे सल्लागार गणेश आबनावे, राजेंद्र भोसले, अमोल शेवाळे यांच्यासह स्थानिक नागरिकांनी विविध प्रश्न मांडले. रेल्वे अधिकारी राकेश शर्मा यांनी संबंधित समस्या समजून घेत त्या लेखी स्वरूपात नोंदवून घेतल्या. प्रवाशांच्या समस्या सोडविण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडून लवकरात लवकर प्रयत्न केले जातील, असे आश्वासन त्यांनी दिल्याचे उपस्थितांनी सांगितले.

सध्या जेजुरी रेल्वे स्थानकाच्या सुशोभीकरणाचे काम सुरू असून स्थानक परिसरात जेजुरी गडाची प्रतिकृतीही साकारण्यात आली आहे. दोन्ही फलाटांच्या बाजूने विविध विकासकामे सुरू आहेत. या कामांसोबतच प्रवाशांच्या मूलभूत गरजा, दिव्यांगांसाठी सुविधा, सुरक्षितता आणि लांब पल्ल्याच्या रेल्वे गाड्यांचे थांबे यांनाही प्राधान्य देण्यात यावे, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली.

धार्मिक पर्यटन, औद्योगिक विकास आणि आंतरराज्यीय प्रवासी वाहतुकीच्या दृष्टीने जेजुरी रेल्वे स्थानकाला विशेष महत्त्व आहे. त्यामुळे केवळ सुशोभीकरणापुरता विकास मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष प्रवासी सुविधांमध्ये सुधारणा करावी आणि जेजुरीला महत्त्वाच्या रेल्वे गाड्यांचे थांबे मिळावेत, अशी मागणी आता पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे. रेल्वे प्रशासन या मागण्यांवर कोणती ठोस कार्यवाही करते, याकडे जेजुरीकरांचे लक्ष लागले आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



चाकणला श्रीराम नगरमध्ये गुणवंतांचा गौरव

चाकण : दैनिक संध्या

चाकण नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक अकरा मधील श्रीरामनगर येथे गटनेते, नगरसेवक साहेबराव कड यांच्या नेतृत्वाखाली गुणवंतांचा गौरव करण्यात आला. विद्यार्थी सन्मान व गणेशोत्सव काळात झालेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वाटप करून सर्वांना मार्गदर्शन करण्यात आले. चाकण नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव, उद्योजक निलेश जेधे, अंकिता बोरकर, किशोर भोसले, डॉ. राहुल महाजन आदींच्या हस्ते गुणवंतांना बक्षीस वाटप करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे सदस्य गणेश अरगडे, नगरसेविका विजया जाधव, रेश्मा मुटके, करण सोनवणे, ज्ञानेश्वर मुंगसे, डॉ.भरत राउत आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते. साहेबराव कड यांनी स्वागत केले. ज्ञानेश्वर मुंगसे यांनी सुत्रसंचालन केले. अजय मनसुक यांनी आभार मानले.



करपे यांना नाट्य गौरव पुरस्कार प्रदान

चाकण : दैनिक संध्या

महाराष्ट्र साहित्य परिषद व संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था यांच्या वतीने येथील आदर्श शिक्षक नारायण करपे यांना राज्यस्तरीय नाट्यगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. येथे आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात कवयित्री डॉ. प्रतिमा इंगोले, प्रसिद्ध लेखक हनुमंत चांदगुडे, आळंदी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अजित वडगावकर, लेखक नामदेव गायकवाड, कविवर्य संतोष गाढवे, मुकुंद गावडे आदींच्या हस्ते करपे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी साहित्य क्षेत्रातील विविध नामांकित लेखक, लेखिका, कवी मोठ्या संख्येने उपस्थित होते. करपे यांनी यावेळी सांगितले की," गेली तीस वर्ष विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या कार्याचा हा सन्मान आहे. हा पुरस्कार माझ्या सर्व बाल प्रेक्षक नाट्य चळवळीतील कलाकारांना समर्पित करत आहे. सदैव रंगभूमीची सेवा नाटक, पथनाटक चित्रपट या माध्यमातून करत राहणार आहे."

महिला नोंदणी मेळावा उत्साहात संपन्न

बोरी: दैनिक संध्या

श्री. राधेश्याम दिव्यांग सशक्तीकरण केंद्राच्या माध्यमातून पिंपरी कावळ (ता.जुन्नर) येथे एकल महिला नोंदणी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात जुन्नर तालुक्यातील विविध गावांमधील एकूण ३५ महिलांनी सहभाग घेतला. पिंपरी कावळ, जांबुत, औरंगपूर, पारगाव तर्फे आळे यांसह परिसरातील गावांमधील महिलांनी या मेळाव्यात उपस्थित राहून नाव नोंदणी केली. विधवा, निराधार व घटस्फोटित महिलांसह नियमानुसार पात्र असलेल्या एकल महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. नोंदणीकृत महिलांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देणे, आवश्यक प्रशिक्षण उपलब्ध करून देणे, कायदेशीर मार्गदर्शन व संरक्षण मिळवण्यासाठी मदत करणे, तसेच त्यांच्या मुलांच्या शिक्षणासंदर्भातील अडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करणे, यावर या उपक्रमात भर देण्यात आला.



चाकण ग्रामीण रुग्णालयात स्वच्छता अभियान

■ चाकण(दै. संध्या)

दिवसेंदिवस चाकणकर नागरिक कचऱ्याच्या दुर्गंधीने त्रस्त झाल्याने त्यांना दिलासा देण्यासाठी चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली एक पाऊल स्वच्छतेकडे अंतर्गत चाकण ग्रामीण रुग्णालयात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

चाकण नगरपरिषदेचे अधिकारी व मान्यवरांच्या उपस्थितीत स्वच्छ भारत अभियान २०२६ अंतर्गत स्वच्छता मोहिमेला चालना देण्यात आली आहे. चाकण शहरातील नागरिकांचे आरोग्य, स्वच्छता आणि हित जपण्याच्या उद्देशाने चाकण नगरपरिषदेच्या वतीने स्वच्छ भारत अभियान २०२६ अंतर्गत वॉर्डनिहाय स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे.



या मोहिमेअंतर्गत नगराध्यक्षा मनिषा गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली चाकण येथील ग्रामीण रुग्णालयात स्वच्छता व सफाई मोहीम राबविण्यात आली.

या उपक्रमात चाकण नगरपरिषदेचे नगरसेवक तथा आरोग्य व स्वच्छता समितीचे सभापती मंगेश कांडगे यांनी स्वतः पुढाकार घेतला.

आरोग्याच्या दृष्टीने ग्रामीण रुग्णालय परिसरात स्वच्छता अत्यंत महत्त्वाची आहे. रुग्णांना स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरण मिळावे, रुग्णालयाचा परिसर स्वच्छ राहावा आणि सार्वजनिक ठिकाणांच्या स्वच्छतेबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने या मोहिमेला विशेष महत्त्व प्राप्त झाले असल्याचे उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी, गटनेते नितीन गोरे व नगरसेवक मंगेश कांडगे यांनी सांगितले. या अभिनव उपक्रमामुळे स्वच्छतेविषयीची सामूहिक जबाबदारी अधोरेखित झाली आहे. अशा सामाजिक उपक्रमांमध्ये नगरपरिषद प्रशासन आणि लोकप्रतिनिधींचा समन्वय अत्यंत महत्त्वाचा असतो.

या स्वच्छता उपक्रमातून शहर स्वच्छ ठेवण्यासाठी सामूहिक सहभागाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. स्वच्छतेचे काम केवळ मोहिमेपुरते मर्यादित न राहता ते दैनंदिन जीवनाचा भाग बनावे, हाच या उपक्रमा मागील व्यापक संदेश असल्याचे नगरसेविका सुवर्णा राक्षे व आरती परदेशी यांनी सांगितले.

" चाकण नगरपरिषदेचे नगरसेवक मंगेश कांडगे यांचा या स्वच्छता मोहिमेतील पुढाकार आणि नगरपरिषद प्रशासनाचा सहभाग यांमधून स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी चाकण घडविण्यासाठी एकत्रित प्रयत्नांची गरज अधोरेखित होते. त्यामुळे नवनवीन उपक्रम राबविण्यास प्रोत्साहन मिळते."

- डॉ. अंकुश जाधव, मुख्याधिकारी, चाकण नगरपरिषद.

" स्वच्छतेचा ध्यास, आरोग्याची जपणूक आणि समाजसेवेची भावना यांचा संगम घडविणाऱ्या अशा उपक्रमांतून चाकण शहराच्या स्वच्छतेला अधिक गती मिळू लागली आहे."

- मनीषा गोरे, नगराध्यक्षा. चाकण

वांगणीवाडी शाळेचे तालुकास्तरीय बालकुमार साहित्य संमेलन स्पर्धांमध्ये घवघवीत यश

■ राजगड (दै. संध्या)

विद्यार्थी व शिक्षकांच्या साहित्यिक, सर्जनशील, कलात्मक व सांस्कृतिक गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी बालकुमार मराठी साहित्य संमेलन 2026 अंतर्गत तालुकास्तरीय स्पर्धा जि. प. प्राथ. शाळा वेल्हे बुद्रुक येथे नुकत्याच पार पडल्या. सदर स्पर्धांमध्ये जि. प. प्राथ. शाळा वांगणीवाडी शाळेची विद्यार्थिनी कु. सई अंकुश वाल्हेकर ही वक्तृत्व स्पर्धेत तालुक्यात प्रथम आली असून त्याच शाळेतील पदवीधर शिक्षक श्री. विकास गायकवाड यांचा शिक्षक गटात वक्तृत्व स्पर्धा व कविता सादरीकरण स्पर्धेत तालुक्यात प्रथम क्रमांक आला असून त्यांची दिनांक 29 ऑक्टोबर, 2026 रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लोणीकंद, तालुका - हवेली येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल त्यांचेअमोलशेठ नलावडे (सभापती, कृषी व पशुसंवर्धन समिती) तानाजीबापू मांगडे (सदस्य, जि.प.पुणे) सुवर्णाताई राऊत (सभापती, पं.स. राजगड) संदीपभाऊ खुटवड (उपसभापती, पं.स.राजगड) सीताताई खुळे (सदस्य, पं.स.राजगड) किरणभाऊ राऊत (अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस) मा. संजय ढमाळ साहेब (गटविकास अधिकारी पं. स.राजगड) अजित पाटील साहेब (गटशिक्षणाधिकारी पं.स. राजगड) यांनी अभिनंदन केले व जिल्हास्तरीय स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.



श्री. विकास गायकवाड यांनी "शिक्षक-सामाजिक परिवर्तनातील वाटसरू" या विषयावर भाषण सादर केले.

डी.फार्मसी प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचा 'परिचय समारंभ' संपन्न

■ नारायणगाव (दै. संध्या)

येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे शंकरराव उरसळ कॉलेज ऑफ डिप्लोमा फार्मसी महाविद्यालयात प्रथम वर्ष डी. फार्मसी च्या नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत व शैक्षणिक प्रवासाची दमदार सुरुवात करण्यासाठी परिचय समारंभाचे आयोजन करण्यात आले. या महत्वपूर्ण कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी सनदी अधिकारी, मा. आयुक्त अन्न व औषध प्रशासन श्री. महेश झगडे यांची विशेष उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अश्विनी शेवाळे यांनी भूषवले. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन आणि दीपप्रज्वलन करून करण्यात आली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महाविद्यालयामधील विविध समित्या, वर्षभर होणारे विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व सहशासकीय उपक्रम याची सविस्तर माहिती नवोदित विद्यार्थी व त्यांच्या पालकांना देण्यात आली. यावेळी रमेश गारुडकर, सुरेखा धांदोरे या पालकांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक वातावरणा बद्दल, प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाबद्दल, मुलांच्या सुरक्षित व शिस्तप्रिय प्रवासाबद्दल आपले समाधान व कृतज्ञता व्यक्त केली.

चाकण शॉपिंग फेस्टिवल व दिवाळी मेळाव्याला प्रतिसाद, १०० हून अधिक स्टॉल्स हे प्रमुख आकर्षण

■ चाकण (दै. संध्या)

दिवाळीच्या सणानिमित्त खरेदीचा आनंद लुटण्यासोबतच महिला उद्योजिकांना आपल्या उत्पादनांच्या विक्रीसाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या उद्देशाने स्वामिनी महिला बहुउद्देशीय संस्था, चाकण यांच्या वतीने भव्य 'चाकण शॉपिंग फेस्टिव्हल व दिवाळी मेळाव्या'चे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात विविध वस्तूंच्या खरेदीसह खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्याची संधी नागरिकांना मिळाली. तब्बल १०० हून अधिक स्टॉल्स हे या उपक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले.

महिला उद्योजिकांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. महिलांमध्ये अनेक कला, कौशल्ये आणि उद्योजकतेची क्षमता असते. मात्र, अनेकदा आर्थिक मर्यादा आणि योग्य बाजारपेठेचा अभाव यामुळे त्यांच्या कौशल्यांना अपेक्षित संधी मिळत नाही. हीच बाब लक्षात घेऊन स्वामिनी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने महिलांना व्यवसायासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आला आहे. या शॉपिंग फेस्टिव्हलच्या माध्यमातून महिला उद्योजिका, बचत गट आणि विविध व्यावसायिकांना आपल्या उत्पादनांचे प्रदर्शन व विक्री करण्याची संधी मिळाली. त्यामुळे महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाला चालना मिळण्यासोबतच त्यांच्या व्यवसायाची ओळख अधिकाधिक ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी मदत झाल्याचे शुभांगी आगरकर यांनी सांगितले. नगरसेविका ॲड. वर्षा शेवकरी, शोभा शेवकरी यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

चाकण येथील या कार्यक्रमात १०० हून अधिक स्टॉल्स लागले होते. खरेदी आणि खाद्यपदार्थांची मोठी रेलचेल होती. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यात विविध वस्तूंच्या विक्रीसाठी तसेच खाद्यपदार्थांसाठी १०० हून अधिक स्टॉल्स उभारण्यात आले होते. एकाच ठिकाणी विविध वस्तूंची खरेदी करण्याची संधी सर्वांना मिळणार असल्याने चाकण शहरासह परिसरातील नागरिकांसाठी हा मेळावा विशेष आकर्षण ठरला.

याशिवाय, मेळाव्यात सहभागी होणाऱ्या नागरिकांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे खरेदीच्या आनंदासोबतच आरोग्याची काळजी घेण्याची संधीही नागरिकांना मिळाली होती. या मेळाव्यात सहभागी होणाऱ्या स्टॉल धारकांसाठी परवडणारे भाडे, आकर्षक सवलती, प्रत्येक स्टॉलसाठी एक टेबल व दोन खुर्च्या, ऑन ग्राउंड सपोर्ट टीम आणि सुरक्षेची व्यवस्था अशा विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. यामुळे महिला उद्योजिका आणि व्यावसायिकांना आपल्या व्यवसायाची प्रभावी मांडणी करता आली. चाकण येथील स्वामिनी महिला बहुउद्देशीय संस्था केवळ चाकणपुरती मर्यादित न राहता विविध ठिकाणी महिलांच्या सक्षमीकरणासाठी, रोजगारनिर्मितीसाठी आणि महिलांना एकत्र आणून त्यांच्यातील कौशल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे.



सिंधुदुर्गच्या सागरी पर्यटनाला 'गोल्डन बॅनियन ॲवॉर्ड २०२६'; महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब : पर्यटनमंत्री देसाई

■ भारतातील पहिले पाण्याखालील संग्रहालय, कृत्रिम प्रवाळभित्ती आणि पाणबुडी पर्यटन प्रकल्प म्हणून विकसित होत असलेल्या या उपक्रमाची राष्ट्रीय स्तरावर दखल घेतली जाणे, ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब असल्याचे पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी म्हटले आहे.

■ मुंबई(दै. संध्या)

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सागरी पर्यटनाला राष्ट्रीय स्तरावर नवी ओळख मिळवून देणाऱ्या पर्यटन विभागांतर्गत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या (एमटीडीसी) महत्त्वाकांक्षी 'आयएनएस गुलदार' या प्रकल्पाला प्रतिष्ठेचा 'द वीक हेरिटेज ॲवॉर्ड – गोल्डन बॅनियन ॲवॉर्ड २०२६' प्रदान करण्यात आला आहे. भारतातील पहिले पाण्याखालील संग्रहालय, कृत्रिम प्रवाळभित्ती आणि पाणबुडी पर्यटन प्रकल्प म्हणून विकसित होत असलेल्या या उपक्रमाची राष्ट्रीय स्तरावर दखल घेतली जाणे, ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब असल्याचे पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी म्हटले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांनी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे अभिनंदन केले.

'द वीक' मासिकातर्फे 'द वीक हेरिटेज ॲवॉर्ड – गोल्डन बॅनियन ॲवॉर्ड २०२६' प्रदान करण्यासाठी नवी दिल्ली येथील प्रधानमंत्री संग्रहालय व ग्रंथालय येथे २७ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित समारंभात केंद्रीय संस्कृती व पर्यटनमंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक नीलेश गटणे(भाप्रसे) यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी दीपक माने, अधीक्षक अभियंता संजय पाटील, ॲक्वाटिक टूरिझमच्या वरिष्ठ व्यवस्थापक क्षिप्रा बोरा, मुख्य लेखाधिकारी जितेंद्र सोनावणे आदी उपस्थित होते.

पर्यटनमंत्री शंभूराज देसाई म्हणाले, "'द वीक हेरिटेज ॲवॉर्ड' अंतर्गत मिळालेला 'गोल्डन बॅनियन ॲवॉर्ड २०२६' हा सन्मान महाराष्ट्राच्या पर्यटन विकासातील महत्त्वाचा टप्पा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार



यांच्या नेतृत्वात सिंधुदुर्गच्या सागरी पर्यटनाला राष्ट्रीय स्तरावर गौरव मिळणे, ही महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद बाब आहे.'आयएनएस गुलदार'हा प्रकल्प पर्यटनाच्या पारंपरिक संकल्पनेपलीकडे जाऊन आधुनिक पर्यटन अनुभवांची सांगड घालणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. या प्रकल्पामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पर्यटन क्षमतेला नवी दिशा मिळेल. हा पुरस्कार मिळविण्यासाठी योगदान देणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करतो." पर्यटन सचिव संजय यादव म्हणाले, "'आयएनएस गुलदार' प्रकल्पाला मिळालेला 'गोल्डन बॅनियन ॲवॉर्ड २०२६' हा महाराष्ट्राच्या नाविन्यपूर्ण पर्यटन विकासाच्या प्रयत्नांचा गौरव आहे. सागरी वारशाचे संवर्धन, पर्यावरणपूरक पर्यटन आणि पर्यटकांना अनोखा अनुभव देणाऱ्या उपक्रमांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने हा पुरस्कार महत्त्वाचा आहे. राज्यात दर्जेदार, शाश्वत आणि जागतिक स्तरावर लक्ष वेधून घेणारे पर्यटन प्रकल्प विकसित करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत." महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे म्हणाले की, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सागरी पर्यटनाला चालना देण्यासाठी 'आयएनएस गुलदार' या नौकेवर आधारित वैशिष्ट्यपूर्ण पर्यटन प्रकल्प विकसित करण्यात आला आहे.

या प्रकल्पासाठी केंद्र सरकारने ४६.९१ कोटी रुपये, तर महाराष्ट्र शासनाने ११२.४६ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. 'एक्स-आयएनएस गुलदार' ही भारतीय नौदलातील 'मगर' वर्गातील लँडिंग शिप टँक प्रकारातील युद्धनौका आहे. या नौकेने तब्बल ३९ वर्षे राष्ट्रसेवा बजावली असून, १२ जानेवारी २०२४ रोजी ती भारतीय नौदलातून निवृत्त झाली. मे. माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड यांच्या माध्यमातून १९ मे २०२६ रोजी ही नौका सिंधुदुर्ग किनाऱ्यावरील निवती रॉक परिसरात समुद्रतळावर स्थापित करण्यात आली. ही नौका सुमारे २२ मीटर खोलीवर आहे. 'एक्स-आयएनएस गुलदार'ची मजबूत पोलादी रचना आता कृत्रिम प्रवाळभित्ती म्हणून कार्य करणार आहे.

पूरक व्यवसायांना चालना मिळणार

या उपक्रमामुळे सिंधुदुर्गच्या पर्यटन क्षेत्राला नवी ओळख मिळण्यासोबतच स्थानिक पर्यटन व्यवसाय, निवास व्यवस्था, वाहतूक, मार्गदर्शक सेवा आणि इतर पूरक व्यवसायांना चालना मिळणार आहे. पर्यटन विभागांतर्गत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत (एमटीडीसी) मे. माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड यांच्या समन्वयाने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील निवती रॉक परिसरात भारतीय नौदलाची निवृत्त युद्धनौका 'एक्स-आयएनएस गुलदार' हा देशातील अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि वैशिष्ट्यपूर्ण पाणबुडी पर्यटन प्रकल्प विकसित करण्यात आला आहे. भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयांतर्गत 'स्पेशल असिस्टन्स टू स्टेट्स फॉर कॅपिटल इन्व्हेस्टमेंट – डेव्हलपमेंट ऑफ आयकॉनिक टुरिस्ट सेंटर्स टू ग्लोबल स्केल' या योजनेअंतर्गत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागामार्फत हा प्रकल्प विकसित करण्यात आला आहे.

थोडक्यात पण महत्वाचे

राधेयचे धैर्य, स्वाभिमान आणि आपल्या आई-वडिलांवरील निस्सीम प्रेम मला सर्वाधिक भावते

पिंपरी : दैनिक संध्या

सोनी सबच्या 'हस्तिनापूर के वीर' मध्ये पांडव आणि कौरव यांच्या बालपणातील



घडामोडी जिवंतपणे उलगडल्या जातात. त्यांच्या आयुष्याला आकार देणारे नातेसंबंध आणि अनुभव यांचा या मालिकेत सखोल वेध घेतला जातो. व्यंकटेश पांडे साकारत असलेल्या राधेयच्या आगमनासह, कथा आणखी एका महत्त्वाच्या पात्राचा प्रवास दाखवते, ज्याचे आयुष्य पांडव आणि कौरव या दोघांशीही जवळून जोडलेले आहे. एका संवादादरम्यान, व्यंकटेश पांडे यांनी राधेयची भूमिका साकारण्याचा अनुभव, त्याच्या व्यक्तिमत्त्वामागील भावनिक गहिरेपणा समजून घेण्याचा प्रवास आणि त्याचे धैर्य, निष्ठा तसेच कुटुंबावरील प्रेम त्याच्या जीवनप्रवासाला कशा प्रकारे आकार देते याबद्दल मनमोकळेपणाने सांगितले. तसेच सोनी सबच्या 'हस्तिनापूर के वीर'चा भाग बनण्याच्या अनुभवामुळे त्यांना या पात्राचा केवळ एक योद्धा म्हणून नव्हे, तर त्यापलीकडे जाऊन अधिक सखोलपणे शोध घेता आला, हेही त्यांनी सांगितले. 1. राधेयची भूमिका साकारण्याचा तुमचा आतापर्यंतचा अनुभव कसा राहिला आहे आणि या पात्राकडे तुम्ही कशामुळे आकर्षित झालात? राधेयची भूमिका साकारणे हा माझ्यासाठी खरोखरच एक समृद्ध करणारा अनुभव ठरला आहे. त्याचे धैर्य, स्वाभिमान आणि आपल्या आई-वडिलांवरील निस्सीम प्रेम या गुणांनी मला या पात्राकडे आकर्षित केले. मात्र, या भूमिकेकडे मला सर्वाधिक खेचणारी गोष्ट म्हणजे त्याच्या जीवनप्रवासातील भावनिक गहिरेपणा आणि त्याच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक पैलू, जे त्याला अधिक प्रभावी आणि वैशिष्ट्यपूर्ण बनवतात.

एमआयटी एडीटी विद्यापीठात आजपासून 'विश्ववेद संमेलन'

पुणे : दैनिक संध्या

भारतीय वैदिक परंपरा, ज्ञानपरंपरा आणि सांस्कृतिक वारशाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी एमआयटी आर्ट, डिझाइन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्या (एडीटी) वतीने 'विश्व वेद संमेलन २०२६'चे आयोजन २९ व ३० ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे. लोणी काळभोर येथील विद्यापीठाच्या विश्वराजबाग परिसरातील उर्मिलाताई कराड सभागृहात हे दोन दिवसीय संमेलन होणार आहे. संमेलनाच्या पहिल्या दिवशी आंध्र प्रदेशातील काकीनाडा येथील श्रीपीठमचे पीठाधिपती परमपूज्य श्री जगद्गुरू परिपूर्णानंद महास्वामीजी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी श्री अकेल्ला दत्ता दुर्गा साई कुमार घनपाठीजी, श्री संतोष कुमार घनपाठीजी, डॉ. डी. फणी यज्ञेश्वर यजुलू घनपाठीजी आणि श्री विवेक शास्त्री गोदबोले घनपाठीजी यांच्यासह वेदविद्येतील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर रोजी वेदमूर्ती श्री दीपांशू महाराज प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच वेदमूर्ती श्री विश्वास देवकरजी, श्री शरद जोशी महाराज, श्री गिरिजा प्रसाद षडंगीजी, श्री अकेल्ला दत्ता दुर्गा साई कुमार घनपाठीजी आणि श्री मंगेश बावीकर घनपाठीजी यांची उपस्थिती लाभणार आहे. एमआयटी शिक्षण समूहाचे संस्थापक आणि एमआयटी-एडीटी विद्यापीठाचे कुलपती व अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या मार्गदर्शनाखाली हे संमेलन आयोजित करण्यात येत आहे.

बुधवार पेठेतील वेश्याव्यवसायात कार्यरत महिलांना कायदेविषयक मार्गदर्शन

हडपसर: दैनिक संध्या

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे आणि रेव्ह. हरिभाऊ वाघमोडे पाटील



प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार पेठेतील वेश्याव्यवसायात कार्यरत महिलांसाठी कायदेविषयक साक्षरता व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्ष अंजू शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली २७ ऑक्टोबर रोजी हा कार्यक्रम पार पडला.कार्यक्रमात पीडित भरपाई योजना, मोफत कायदेशीर मदत आणि महिलांचे कायदेशीर हक्क यांविषयी माहिती देण्यात आली. संबंधित कायद्यांच्या तरतुदी, कायद्याने प्रतिबंधित असलेल्या कृती तसेच पोलिसांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांवर मार्गदर्शन करण्यात आले. महिलांची सुरक्षितता, प्रतिष्ठा आणि गोपनीयता जपण्याचे महत्त्वही अधोरेखित करण्यात आले. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर या महिलांच्या जीवनात सणाचा आनंद पोहोचविण्याच्या उद्देशाने पणत्यांचे वाटप करण्यात आले. डिव्हाइन जैन ग्रुपच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. तसेच महिलांच्या दैनंदिन गरजांसाठी जीवनावश्यक धान्याचेही वाटप करण्यात आले. असुरक्षित परिस्थितीत जगणाऱ्या महिलांना कायदेशीर मदत आणि न्यायप्रक्रियेची माहिती सुलभतेने उपलब्ध करून देणे, तसेच त्यांना सन्मानपूर्वक वागणूक मिळण्यासाठी प्रयत्न करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या नफ्यात १९६.५% वाढ

■ मुंबई (दै. संध्या)

आयडीएफसी फर्स्ट बँकेने आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या दुसऱ्या तिमाहीत दमदार आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. ३० सप्टेंबर २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीत बँकेचा करपश्चात निव्वळ नफा (पीएटी) वार्षिक तुलनेत १९६.५ टक्क्यांनी वाढून १,०४५ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. विशेष म्हणजे, सलग दुसऱ्या तिमाहीत बँकेने एक हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक निव्वळ नफा नोंदवला आहे. आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत बँकेचा एकूण निव्वळ नफा २,१२० कोटी रुपये झाला असून, या कालावधीत मालमत्तेवरील परतावा (आरओए) ०.९९ टक्के नोंदवण्यात आला आहे. बँकेच्या नफ्यातील वाढीसोबतच ठेवींचे संकलन, कर्जवाटप आणि परिचालन कार्यक्षमतेतही सुधारणा झाल्याचे तिमाही निकालांतून स्पष्ट झाले आहे.बँकेच्या एकूण ठेवींमध्ये वार्षिक तुलनेत २५.९ टक्के, तर मागील तिमाहीच्या तुलनेत ११.८ टक्के वाढ झाली आहे. त्यामुळे एकूण ठेवी ३,४८,५८३ कोटी रुपयांवर पोहोचल्या आहेत.

दुसरीकडे, बँकेच्या एकूण कर्जे आणि अग्रिम रकमेत वार्षिक तुलनेत ३०.१ टक्के वाढ होऊन ती ३,४६,९१३ कोटी रुपये झाली आहे. एफसीएनआर (बी) ठेवींच्या तारणावर दिलेली कर्जे वगळल्यास, आयबीपीसीपूर्व आधारावर कर्जवाढ २२.२ टक्के राहिली आहे.

बँकेचे सरासरी चालू खाते आणि बचत खाते (सीएएसए) ठेवींचे प्रमाण दुसऱ्या तिमाहीत ४८.४ टक्के नोंदवण्यात आले. मागील तिमाहीत हे प्रमाण ५०.१ टक्के होते. एफसीएनआर (बी) ठेवींच्या मोठ्या प्रमाणातील संकलनामुळे या प्रमाणात किरकोळ घट झाल्याचे बँकेने स्पष्ट केले आहे.

बँकेच्या परिचालन कार्यक्षमतेतही सुधारणा झाली आहे. ट्रेडिंगमधील नफा वगळता, मुख्य परिचालन नफा वार्षिक तुलनेत ३८.५ टक्क्यांनी वाढून २,५२७ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. सलग दुसऱ्या तिमाहीत परिचालन खर्चातील वाढ ही उत्पन्नातील वाढीपेक्षा वार्षिक तुलनेत सुमारे ५०० बेसिस पॉइंट्सने कमी राहिली आहे.

आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत वाढीव खर्च-उत्पन्न गुणोत्तर ५५ टक्के नोंदवण्यात आले. ट्रेडिंगमधील नफा वगळता, मुख्य खर्च-उत्पन्न गुणोत्तर मागील तिमाहीतील ७०.७३ टक्क्यांवरून सुधारून दुसऱ्या तिमाहीत ७०.१६ टक्क्यांवर आले. यामुळे बँकेच्या खर्च नियंत्रणातील सुधारणा अधोरेखित झाली आहे.

बँकेने मालमत्तेची गुणवत्ता स्थिर राखली आहे. सकल अनुत्पादित मालमत्ता (जीएनपीए) १.३२ टक्के, तर निव्वळ अनुत्पादित मालमत्ता (नेट एनपीए) ०.४० टक्के नोंदवण्यात आली. सरासरी मालमत्तेच्या तुलनेत कर्जावरील क्रेडिट कॉस्ट कमी होऊन १.०१ टक्क्यांवर आली आहे. दुसऱ्या तिमाहीत मालमत्तेवरील परतावा ०.९३ टक्के राहिला.

या तिमाहीतील बँकेची सर्वांत महत्त्वाची कामगिरी म्हणजे ३४,३९० कोटी रुपये, अर्थात सुमारे ३.६ अब्ज अमेरिकी डॉलरच्या एफसीएनआर (बी) ठेवींचे संकलन. विशेष म्हणजे, भारताबाहेर बँकेची कोणतीही शाखा, उपकंपनी किंवा प्रतिनिधी कार्यालय नसतानाही डिजिटल माध्यमे आणि ग्राहकांच्या विश्वासाच्या बळावर हे संकलन करण्यात आले.

अल्फा चावर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर ३१ ऑक्टोबर रोजी रात्री ८ वाजता

■ मुंबई (दै. संध्या)



सोनी मॅक्स आपल्या फेस्टिव्ह लाइन-अपमध्ये ॲक्शनचा जबरदस्त तडका घेऊन येत आहे. यश राज फिल्म्स च्या अल्फाचा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर 31 ऑक्टोबर रोजी रात्री 8 वाजता प्रसारित होणार आहे. आलिया भट्ट आणि शर्वरी यांच्या प्रमुख भूमिका असलेला हा चित्रपट दोन धाडसी आणि घातक तरुणींची ओरिजिन स्टोरी असून, प्रेक्षकांसाठी एक धमाकेदार ॲक्शन एंटरटेनर घेऊन येत आहे. शिव रवैल दिग्दर्शित या चित्रपटात बॉबी देओल आणि अनिल कपूर महत्त्वपूर्ण भूमिकांमध्ये दिसणार आहेत. आलिया भट्ट एका अगदी वेगळ्या आणि यापूर्वी कधीही न पाहिलेल्या भूमिकेत दिसणार आहे. ती एका अशा असॅसिनची भूमिका साकारत आहे, जिला मारण्यासाठी प्रशिक्षित करून तयार करण्यात आले आहे. हाय-ऑक्टेन ॲक्शन, शानदार व्हिज्युअल्स आणि थराराने भरलेला Alpha आलिया आणि शर्वरी या दोघींच्या निर्भय आणि दमदार अल्फा वृत्तीचा उत्सव साजरा करतो. हा चित्रपट प्रेक्षकांना एक रोमांचक आणि मनोरंजक अनुभव देण्याचे वचन देतो.

भव्य स्तरावर साकारलेला आणि प्रभावी कथानक असलेला अल्फा सर्व पिढ्यांतील प्रेक्षकांसाठी ब्लॉकबस्टर अनुभव घेऊन येतो. या चित्रपटाचा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर हा सोनी मॅक्स च्या फेस्टिव्ह लाइन-अपमधील आणखी एक शानदार चित्रपट आहे. निर्भीड कथाकथन आणि हाय-व्होल्टेज मनोरंजनाचा उत्सव साजरा करणारा हा फेस्टिव्ह लाइन-अप, या सीझनमधील बॉलिवूडच्या मोठ्या मनोरंजनाच्या क्षणांसाठी सज्ज आहे.

साडेसतरानळी मनपा शाळेतील ४०० हून अधिक विद्यार्थ्यांचा जीवघेणा धोका टळला

■ हडपसर(दै. संध्या)

पुणे महानगरपालिका शिक्षण विभाग (प्राथमिक) अंतर्गत येणाऱ्या साडेसतरा नळी येथील मनपा शाळेत शिकणाऱ्या ४०० हून अधिक विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न अखेर सुटला आहे. शाळेच्या प्रांगणात असलेले आग्या मधमाश्यांचे मोठे पोळे प्रशासनाच्या वतीने त्वरित हटवण्यात आले असून, यामुळे विद्यार्थ्यांवर घोंघावणारे मोठे संकट टळले आहे. क्रांती शेतकरी संघाचे अमोल नाना तुपे यांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे आणि सततच्या पाठपुराव्यामुळे ही कारवाई अत्यंत वेगाने पूर्ण झाली.

विद्यार्थ्यांच्या जीवाला होता मोठा धोका: साडेसतरा नळी येथील मनपा शाळेत पहिली ते सातवीचे ४०० हून अधिक निष्पाप आणि गरीब कुटुंबांतील चिमुरडे शिक्षण घेत आहेत. शाळेच्या प्रांगणात आग्या मधमाश्यांचे मोठे पोळे असल्याने या मुलांच्या सुरक्षेचा अत्यंत गंभीर आणि जीवघेणा प्रश्न निर्माण झाला होता.

क्रांती शेतकरी संघाचा पुढाकार: विद्यार्थ्यांच्या जीवाशी चाललेला हा खेळ थांबवण्यासाठी क्रांती शेतकरी संघाचे अमोल नाना तुपे यांनी तात्काळ पुढाकार घेतला. त्यांनी या समस्येबाबत हडपसर प्रभाग समितीचे अध्यक्ष प्रशांत मामा तुपे आणि हडपसर-मांजरी क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त कुणाल धुमाळ यांना लेखी निवेदन दिले.

प्रशासनाकडून तात्काळ दखल व पाहणी: या निवेदनाची गांभीर्याने दखल घेत प्रभाग समिती अध्यक्ष प्रशांत मामा तुपे, सहाय्यक आयुक्त कुणाल धुमाळ आणि नगरसेवक मारुती आबा तुपे यांनी स्वतः सदर मनपा शाळेला भेट दिली व परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली.

त्वरित कारवाईचे आदेश: परिस्थितीचे गांभीर्य ओळखून उपस्थित लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांनी आग्या मधमाश्यांचे पोळे त्वरित हटवण्याबाबत संबंधित प्रशासकीय विभागाला जागेवरच कडक निर्देश दिले.

एंटाला इंडस्ट्रीजचा आयपीओ २९ ऑक्टोबरला खुला होणार

■ मुंबई (दै. संध्या)

पॅकेजिंग उत्पादन क्षेत्रातील राजकोटस्थित एंटाला इंडस्ट्रीज लिमिटेडचा प्रारंभिक सार्वजनिक समभाग विक्री प्रस्ताव (आयपीओ) २९ ऑक्टोबर २०२६ रोजी गुंतवणुकीसाठी खुला होणार आहे. या आयपीओच्या माध्यमातून कंपनी ₹२३.३३ कोटी उभारण्याचा प्रयत्न करणार असून, हा इश्यू २ नोव्हेंबर २०२६ रोजी बंद होईल. कंपनीचे समभाग बीएसई एसएमई प्लॅटफॉर्मवर सूचीबद्ध करण्याचा प्रस्ताव आहे. कंपनीच्या आर्थिक कामगिरीनुसार, ३० सप्टेंबर २०२६ रोजी संपलेल्या सहा महिन्यांत एंटाला इंडस्ट्रीजने कामकाजातून ₹३०.११ कोटी महसूल आणि ₹४.१९ कोटी करानंतरचा नफा (PAT) नोंदवला आहे. या कालावधीत कंपनीचा EBITDA ₹५.७६ कोटी असून, EBITDA मार्जिन १९.१२ टक्के राहिला आहे.

एंटाला इंडस्ट्रीजचा हा बुक-बिल्ट इश्यू पूर्णपणे ३४.८२ लाख नवीन इक्विटी समभागांचा असेल. प्रत्येक समभागाची





किंमत ₹६३ ते ₹६७ अशी निश्चित करण्यात आली आहे. एका लॉटमध्ये २,००० समभाग असतील. वरच्या किंमत मर्यादेनुसार एका लॉटसाठी ₹१,३४,००० गुंतवावे लागतील. दिलेल्या इश्यू तपशीलांनुसार, किरकोळ गुंतवणूकदारांसाठी किमान अर्ज दोन लॉटचा म्हणजेच ४,००० समभागांचा असून, त्यासाठी ₹२,६८,००० आवश्यक असतील. समभागांचे वाटप ३ नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम होण्याची अपेक्षा आहे, तर संभाव्य सूचीकरण तारीख ५ नोव्हेंबर २०२६ आहे. वत्सा कॅपिटल व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड या इश्यूचे बुक-रनिंग लीड मॅनेजर असून, बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड रजिस्ट्रार म्हणून काम पाहणार आहे.

कंपनीच्या आर्थिक आकडेवारी नुसार, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये कामकाजातून मिळणारा महसूल ₹४७.४० कोटी होता. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये हा महसूल ₹३१.८५ कोटी होता. म्हणजेच वार्षिक महसुलात लक्षणीय वाढ झाली आहे.

आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये कंपनीने ₹६.१५ कोटी EBITDA नोंदवला, तर मागील आर्थिक वर्षात तो ₹२.८३ कोटी होता. त्याचप्रमाणे, करानंतरचा नफा आर्थिक वर्ष २०२५ मधील ₹१.८१ कोटींवरून आर्थिक वर्ष २०२६ मध्ये ₹४.२४ कोटींवर पोहोचला. EBITDA मार्जिनही ९.३४ टक्क्यांवरून १२.९७ टक्क्यांपर्यंत वाढला. दीर्घकालीन आर्थिक आकडेवारीनुसार, कंपनीचा महसूल आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील ₹१२.५१ कोटींवरून आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ₹४७.४० कोटी झाला. याच कालावधीत निव्वळ नफा ₹०.८९ कोटींवरून ₹४.२४ कोटींवर पोहोचला. ३० सप्टेंबर २०२६ रोजी कंपनीची एकूण मालमत्ता ₹३४.८८ कोटी आणि निव्वळ संपत्ती ₹२२.१७ कोटी होती.

गणेशोत्सव सन्मान सोहळा २०२६ उत्साहात संपन्न; पोलीस अधिकारी व पोलीस मित्रांचा गौरव

■ पुणे (दै. संध्या)



गणेशोत्सव काळात उत्कृष्ट कार्य, कर्तव्यनिष्ठा आणि जनसेवेच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार तसेच पोलीस मित्रांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी पीसकिपर्स वेल्फेअर फाउंडेशन – शान्तिरक्षक कल्याण संस्था (पोलीस मित्र) यांच्या वतीने बुधवार, दिनांक २८ ऑक्टोबर २०२६ रोजी गणेशोत्सव सन्मान सोहळा २०२६ आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमास फरासखाना विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन हिरे, विश्रामबाग विभागाच्या सहाय्यक पोलीस आयुक्त अनुजा देशमाने, फरासखाना पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप देशमाने आणि विश्रामबाग पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक (गुन्हे) विकास भिंगारदिवे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.


संस्थेचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष उमेद सुथार यांच्या मार्गदर्शनाखाली हा सन्मान सोहळा पार पडला. गणेशोत्सव काळात पोलीस प्रशासनासोबत समन्वय साधून शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी सहकार्य करणाऱ्या पोलीस मित्रांच्या कार्याचे यावेळी विशेष कौतुक करण्यात आले. संस्थेच्या सर्व पदाधिकारी व सभासदांना त्यांच्या सेवाभावी कार्याबद्दल प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन हिरे यांनी शान्तिरक्षक कल्याण संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. संस्थेचे सदस्य प्रामाणिकपणे आणि निःस्वार्थ भावनेने समाजसेवा करत आहेत, ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. पोलीस प्रशासनासोबत समन्वय साधून जनहितासाठी कार्य करणे महत्त्वाचे असून, संस्थेच्या सदस्यांनी यापुढेही जबाबदारीने आणि सेवाभावाने कार्य करत राहावे, असे मार्गदर्शन त्यांनी केले.सहाय्यक पोलीस आयुक्त अनुजा देशमाने यांनी गणेशोत्सव काळात शान्तिरक्षक कल्याण संस्थेच्या टीमचे कार्य जवळून पाहिल्याचे सांगितले. संस्थेच्या सदस्यांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पोलीस प्रशासनाला सहकार्य केले आणि आपली जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडली, असे त्यांनी नमूद केले. टीमचा शिस्तबद्धपणा, समर्पण आणि सेवाभावी वृत्ती कौतुकास्पद असल्याचे सांगून त्यांनी सर्व सदस्यांचे अभिनंदन केले.पोलीस प्रशासन आणि नागरिक यांच्यातील समन्वय मजबूत करण्यासाठी पोलीस मित्रांची भूमिका महत्त्वाची असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. समाजात शांतता, सुरक्षितता आणि सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्यासाठी संस्थेने भविष्यातही पोलीस प्रशासनासोबत समन्वय साधून जनहिताची कामे सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.



दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर २०२६

पुणे शहर व जिल्हा

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews





महापालिकेच्या कारवाईने तीर्थ टॉवर्सची सुरक्षा वाऱ्यावर?

संरक्षक भिंत व गेट तातडीने उभारण्यासह संबंधित अधिकाऱ्यांच्या निलंबन व बडतर्फीची रहिवाशांची मागणी

■ पुणे (दै. संध्या)

बाणेर-सूस येथील तीर्थ टॉवर्स सहकारी गृहनिर्माण संस्थेची संरक्षक भिंत आणि मुख्य प्रवेशद्वार पाडल्यामुळे रहिवाशांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे पाडण्यात आलेली संरक्षक भिंत तातडीने बांधून द्यावी, सोसायटीचे गेट पूर्ववत बसवावे आणि या बेकायदेशीर कारवाईस जबाबदार असलेल्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे तत्काळ निलंबन करून त्यांना नोकरीतून बडतर्फ करावे, अशी मागणी सोसायटीच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात पत्रकार भवन, नवी पेठ येथे आयोजित पत्रकार परिषदेत सोसायटीचे अध्यक्ष रणजित चव्हाण, सचिव भरत पासी आणि कमिटी सदस्य तथा सामाजिक कार्यकर्त्या प्रज्ञा वाघमारे यांनी भूमिका मांडली. यावेळी सोसायटी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. रणजित चव्हाण म्हणाले, " आम्हाला पालिकेकडून आलेल्या नोटीसमध्ये केवळ सोसायटीची कमान पाडणार असल्याचे म्हटले होते. मात्र कमानीपासून २०० फूट दूर असलेली संरक्षक भिंतही पालिकेने कोणतीही पूर्वसूचना न देता पाडली आहे. या कारवाई संदर्भात सोसायटीने पुणे महानगरपालिकेच्या आयुक्तांना निवेदन दिले आहे, मात्र त्यावर अद्याप कोणतीही ठोस भूमिका घेण्यात आलेली नाही. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने तीर्थ टॉवर्सची संरक्षक भिंत आणि मुख्य प्रवेशद्वार पाडले. या कारवाईमुळे सोसायटीची सुरक्षा व्यवस्था धोक्यात आली आहे. रहिवाशांना असुरक्षिततेचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे आयुक्त व संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे वेळीच लक्ष द्यायला हवे." संरक्षक भिंतीचे पुनर्बांधकाम पूर्ण होईपर्यंत पुणे महानगरपालिकेने संबंधित पोलिस कार्यालयाशी संपर्क साधून सोसायटी परिसरात नियमित पोलिस गस्तीची व्यवस्था करावी, अशी मागणी भरत पासी यांनी केली. संरक्षक भिंत आणि मुख्य प्रवेशद्वार नसल्यामुळे अनधिकृत प्रवेशाचा धोका वाढला असून, चोरी, घरफोडी आणि वाहनचोरीसारख्या घटनांची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पुनर्बांधकाम होईपर्यंत रहिवाशांच्या सुरक्षिततेसाठी पोलिस गस्त उपलब्ध करून देण्याची जबाबदारी महापालिकेने घ्यावी, असे ते म्हणाले. बेकायदेशीरपणे पाडण्यात आलेली संरक्षक भिंत २४ तासांच्या आत पुन्हा बांधून द्यावी आणि सोसायटीचे मुख्य प्रवेशद्वार त्वरित पूर्ववत बसवावे. रहिवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या दोन्ही बाबी अत्यंत महत्त्वाच्या असून, त्यासाठी कोणतीही दिरंगाई करू नये. सोसायटीच्या लगतच्या परिसरात उंदीर, साप, डुकरे, भटकी कुत्री यांचा वावर आहे. सोसायटीच्या परिसरात लहान मुले खेळतात, महिला, ज्येष्ठ नागरिक सोसायटीच्या आवारात चालण्यासाठी येतात, पण अशाप्रकारच्या कारवाईमुळे लहान मुले वे ज्येष्ठ नागरीकांना एकट्याने फिरणे अवघड झाले आहे. संरक्षक भिंत नसल्याने मुलांसह महिलांची सुरक्षा धोक्यात आली आहे, असे प्रज्ञा वाघमारे यांनी नमूद केले. आम्ही सर्वसामान्य नागरीक आहोत, मात्र पालिका अशाप्रकारे कारवाई करत असेल तर आमच्या सुरक्षेची जबाबदारी कोणाची असा प्रश्न येथील रहिवाशांनी उपस्थित केला आहे. बांधकाम व्यावसायिक स्वत:च्या फायद्यासाठी यंत्रणांचा वापर करुन सर्वसामान्यांना वेठीस धरत आहेत. असे करणे चुकीचे असून प्रशासनाने आमच्या तक्रारीची त्वरीत दखल घ्यावी. स्थानिक नगरसेवकांनाही याबाबत कल्पना दिलेली असून त्यांनीही याकडे लक्ष घातलेले नाही. मत मागण्यासाठी येणारे लोकप्रतिनिधी अशावेळी कुठे जातात असा प्रश्न सोसायटीतील रहिवाशांनी उपस्थित केला आहे.

श्री क्षेत्र लेण्याद्री येथे संकष्टी चतुर्थीनिमित्त भाविकांची अलोट गर्दी

■ जुन्नर (दै. संध्या)



गुरुवार, दि. २९ ऑक्टोबर २०२६ रोजी संकष्टी चतुर्थीनिमित्त अष्टविनायकांपैकी एक असलेले श्री क्षेत्र लेण्याद्री (ता.जुन्नर) येथे'श्री गिरिजात्मज'गणपतीचे दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची वर्दळ सुरू झाली होती. पुणे, अहिल्यानगर, मुंबई, ठाणे, नाशिक तसेच जुन्नर परिसरातील विविध गावांतून आलेल्या हजारो भाविक व पर्यटकांनी श्रींचे दर्शनाचा लाभ घेतला. संपूर्ण लेण्याद्री परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. संकष्टी चतुर्थीनिमित्त 'श्री गिरिजात्मज' गणपतीच्या मूर्तीसह मंदिर परिसरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. या सजावटीमुळे मंदिराच्या परिसराला विशेष धार्मिक आणि प्रसन्न स्वरूप प्राप्त झाले होते. 'श्री गिरिजात्मज' गणपतीचे दर्शनासाठी आलेल्या भाविक व पर्यटकांमध्ये मोठा उत्साह दिसून येत होता. संकष्टी चतुर्थीनिमित्त श्री लेण्याद्री गणपती देवस्थान ट्रस्टच्या वतीने सकाळी ६.१५ वाजता देवस्थानचे विश्वस्त सदाशिव ताम्हाणे यांच्या हस्ते 'श्री गिरिजात्मज' गणपतीच्या मूर्तीस विधीवत अभिषेक व महापूजा करण्यात आली. त्यानंतर भाविक व पर्यटकांकरीता श्रींचे दर्शनाची व्यवस्था करण्यात आली. मंदिरात सकाळी ७ वाजता, दुपारी १२ वाजता आणि सायंकाळी ७ वाजता श्रींची महाआरती करण्यात आली. संकष्टी चतुर्थीनिमित्त दिवसभर विविध धार्मिक विधी आणि उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भाविक व पर्यटकांना श्रींचे दर्शन सुलभतेने घेता यावे, याकरीता देवस्थान ट्रस्टच्या वतीने नियोजनबद्ध व्यवस्था करण्यात आली होती. दर्शनासाठी येणाऱ्या भाविक व पर्यटकांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यावर देवस्थान प्रशासनाने भर दिला. संकष्टी चतुर्थीच्या निमित्ताने श्री क्षेत्र लेण्याद्री परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. यानिमित्त देवाचे नैवेद्याकरीता दौंड येथील विक्रम पांडुरंग दिवेकर यांनी २ कॅरेट केळींचा प्रसाद अर्पण केला. तसेच वारकरी संप्रदायाचे वै.ह.भ.प. लक्ष्मण केरू भोसले यांच्या स्मरणार्थ वारकरी संप्रदाय यांच्या वतीने भाविक भक्तांकरीता खिचडी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी श्री मुक्ताई प्रसादिक भजनी मंडळ, शिवेचीवाडी यांच्या वतीने संगीतमय भजनसेवा करण्यात आली. रात्री चंद्रोदयाच्या वेळी श्रींची महाआरती करण्यात आली. त्यानंतर जुन्नर येथील खालचा माळीवाडा परिसरातील जय गणेश ग्रुप व के. एम. ग्रुप यांच्या वतीने भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. दिवसभर सुरू असलेल्या धार्मिक कार्यक्रमांमुळे मंदिर परिसरात भक्तिरस आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते.

थोडक्यात पण महत्वाचे



आमदार सुनील शेळकेंच्या निषेधार्थ माहिती अधिकार कार्यकर्त्याचे धरणे आंदोलन

■ कथित मारहाण आणि धमकी प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी; गौण खनिज उत्खनन व रॉयल्टी व्यवहारही चर्चेत

पुणे : दैनिक संध्या

मावळचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सुनील शेळके यांच्या निषेधार्थ माहिती अधिकार कार्यकर्ते सुनील गुजर यांनी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन केले. भ्रष्टाचार आणि कथित बेकायदेशीर उत्खननाची माहिती उघड केल्याच्या कारणावरून आपल्याला मारहाण करून धमकावण्यात आल्याचा आरोप गुजर यांनी केला आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, तसेच गौण खनिज उत्खनन आणि रॉयल्टी व्यवहारांची चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली. आंदोलनादरम्यान पत्रकारांशी बोलताना सुनील गुजर यांनी सांगितले की, टाटा कंपनीशी संबंधित कथित बेकायदेशीर उत्खनन आणि तळेगाव एमआयडीसीतील आंबळे गावातील कथित भ्रष्टाचाराची माहिती त्यांनी समोर आणली होती. या प्रकरणांमधील गैरव्यवहार उघड केल्याचा राग मनात धरून १६ ऑक्टोबर रोजी आमदार सुनील शेळके यांनी काही व्यक्तींसह आपल्याला मारहाण केल्याचा आरोप गुजर यांनी केला. या घटनेदरम्यान माहिती अधिकारातून मिळवलेली कागदपत्रे हिसकावून घेण्यात आली, असा दावाही त्यांनी केला. तसेच, आपल्याला धमकी देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या आरोपांमुळे माहिती अधिकार कार्यकर्त्यांच्या सुरक्षिततेचा आणि भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवणाऱ्यांना संरक्षण मिळण्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या कथित घटनेवेळी जमीन हक्क परिषदेच्या राज्य महिला अध्यक्ष करुणाताई सरोदे यांनाही जातीवाचक शिवीगाळ करून धक्काबुक्की करण्यात आल्याचा आरोप सुनील गुजर यांनी केला आहे. या आरोपांची निष्पक्ष चौकशी करून संबंधित व्यक्तींची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी त्यांनी केली.

१६६८ पासून महाराष्ट्र-फ्रान्स व्यापारी वारसा; डॉ. अमोल शिंदे यांचे प्रतिपादन



पुणे : दैनिक संध्या

तीन शतकांहून अधिक काळाच्या व्यापारी परंपरेचा वारसा सांगत, महाराष्ट्राने जागतिक गुंतवणुकीसाठी आपली दारे अधिक खुली केल्याचे MIDC चे सह-मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अमोल शिंदे यांनी स्पष्ट केले. पुणे येथे झालेल्या पहिल्या इंडो-फ्रेंच मॅन्युफॅक्चरिंग सेमिनारमध्ये बोलताना डॉ. शिंदे यांनी हा एक महत्त्वाचा ऐतिहासिक संदर्भ दिला. यावेळी एमआयडीसी (MIDC)चे सह-मुख्य कार्यकारी अधिकारी (गुंतवणूक प्रोत्साहन) डॉ. अमोल शिंदे, मुंबईतील फ्रान्सचे महावाणिज्यदूत (Consul General) पॅट्रिक लेव्हेरिनो, आयएफसीसीआय (IFCCI)चे प्रादेशिक संचालिका (पश्चिम विभाग) श्वेता पाहुजा, आयएफसीसीआय (IFCCI) उद्योग समितीचे उपाध्यक्ष अरुण सधीश, महिला व बालकल्याण समिती, पुणे जिल्हा परिषदचे सभापती अंकिता पाटील, कंपनी सेक्रेटरी अभिजीत मोडक यावेळी उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. अमोल शिंदे म्हणाले, "महाराष्ट्र आणि फ्रान्स यांच्यातील पहिला अधिकृत व्यावसायिक संबंध १६६८ मध्ये प्रस्थापित झाला, जेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांनी फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीला राजापूर (कोकण) येथे वखार उभारण्याची परवानगी दिली होती," याच ऐतिहासिक नात्याला आधुनिकतेची जोड देताना, त्यांनी महाराष्ट्र सरकारच्या गुंतवणूक सुलभतेच्या उपाययोजनांची माहिती दिली. यामध्ये IFCCI-MIDC भागीदारी, MIDC कंट्री डेस्क, MILAAP लँड पोर्टल, MAITRI 2.0 आणि इन्व्हेस्ट महाराष्ट्र या उपक्रमांचा समावेश आहे. त्यानंतर झालेल्या CEO Roundtable मध्ये त्यांनी उद्योजकांच्या प्रश्नांना थेट उत्तरे दिली. फ्रान्सचे मुंबईतील महावाणिज्यदूत पॅट्रिक लेव्हरिनो यांच्यासह ८० हून अधिक दिग्गज उद्योजक या सेमिनारला उपस्थित होते.

वाघोलीचा पाणीपुरवठा पूर्ववत होण्याचा मार्ग झाला मोकळा

■ लोणी काळभोर (दै. संध्या)



शिरूर-हवेली विधानसभा मतदारसंघातील भीमा नदीकाठच्या गावांमध्ये निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर वढू बंधाऱ्यात पाणी सोडल्यामुळे वाघोली गावाची पाणीपुरवठा योजना पूर्ववत होण्याचा मार्ग मोकळा झाला असून, वाघोली पंचक्रोशीतील सुमारे एक लाख नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. आमदार माऊली आबा कटके यांनी पाणीप्रश्न सोडविण्यासाठी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. यंदा अपेक्षित पाऊस न झाल्याने भीमा नदीतील पाणीसाठा मोठ्या प्रमाणात कमी झाला होता. परिणामी, नदीकाठच्या गावांमधील तसेच वाघोली पंचक्रोशीतील प्रादेशिक व स्थानिक पाणीपुरवठा योजनांवर परिणाम झाला होता. वाघोलीतील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनल्याने उपलब्ध जलसाठ्याचे योग्य नियोजन करून भीमा नदीपात्रात पाणी सोडण्याची मागणी आमदार माऊली आबा कटके यांनी सातत्याने लावून धरली होती. या पाठपुराव्यानंतर भामा आसखेड धरणातून २ हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग सोडण्यात आला. हे पाणी आता रात्रीच्या सुमारास वढू बंधाऱ्यात दाखल झाले आहे. त्यामुळे परिसरातील पाणीपुरवठा योजना पुन्हा सुरू होण्यास मदत होणार असून, वाघोली गावाचा पाणीप्रश्न मार्गी लागण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. बंधाऱ्यात पाणी दाखल झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

"शिरूर-हवेली मतदारसंघातील माझ्या मायबाप जनतेला पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागू नये, यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील आहे. भीमा नदीकाठच्या गावांमध्ये निर्माण झालेली पाणीटंचाई दूर करण्यासाठी संबंधित यंत्रणांकडे पाठपुरावा करून नदीपात्रात पाणी सोडण्यासाठी प्रयत्न केले. वढू बंधाऱ्यात पाणी दाखल झाल्याने वाघोलीच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न पूर्ववत होण्यास मोठी मदत होणार आहे. नागरिकांना दिलासा मिळणे ही समाधानाची बाब आहे. मात्र, सध्याची परिस्थिती लक्षात घेता प्रत्येकाने पाण्याचा काटकसरीने वापर करावा आणि पाण्याचा अपव्यय टाळावा, असे आवाहन आमदार माऊली आबा कटके यांनी केले आहे.

मराठी भाषा जोपासली पाहिजे : डॉ. उल्हास पवार

आळंदीत 'साहित्य निष्ठांची मांदियाळी' या संतसाहित्य नांदी संमेलनाचे उद्घाटन संपन्न

■ आळंदी (दै. संध्या)



वारकरी सांप्रदाय संतांच्या विचारांचा वारसा जपणारा ज्ञान समृद्ध सांप्रदाय आहे. हा सांप्रदाय समता, बंधुभाव आणि शिस्तीची जगातील सर्वांत मोठी परंपरा जपतो. त्यामुळे कीर्तनातून संत विचारांचे शुद्धपणे प्रबोधन होणे गरजेचे आहे. आपली अभिजात लोकसंस्कृती टिकवायची असेल तर मराठी भाषा जोपासली पाहिजे. असे विचार जेष्ठ साहित्यिक आणि संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ.उल्हास पवार यांनी व्यक्त केले. विश्वशांती केंद्र आळंदी, माईर्स एमआयटी पुणे, महाराष्ट्र साहित्य परिषद आणि महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने १०० व्या साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित आळंदीतील १७ व्या नांदी संमेलनाचे अध्यक्ष म्हणून पवार यावेळी ते बोलत होते. या संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ गायिका उषाताई मंगेशकर यांच्या हस्ते झाले. यावेळी माजी संमेलनाध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ६९ व्या साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष व माईर्स विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ.विश्वनाथ कराड यांचा याप्रसंगी विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी मसापचे कोशाध्यक्ष प्रदीप निफाडकर, कार्यवाह सुनील महाजन, राजन लाखे, प्रभाकर ओव्हाळ, बबनराव कुऱ्हाडे, उपनगराध्यक्ष सुजाता तापकीर, नगरसेविका पूजा घुंडरे, अशोक उमरगेकर आणि माईर्स एमआयटी संस्थेच्या महासचिव प्रा. स्वाती कराड - चाटे आदी उपस्थित होते. आज जग अशांततेच्या उंबरठ्यावर असताना संतांच्या तत्त्वज्ञानाची गरज पूर्वीपेक्षा अधिक भासत आहे. केवळ भौतिक विज्ञानाने मानवाला शांती, सुख आणि समाधान लाभू शकत नाही. विज्ञान आणि अध्यात्म जेव्हा एकत्र येईल, तेव्हाच जगात खरी शांतता प्रस्थापित होईल आणि मानवाचे कल्याण होईल." असा विश्वास डॉ.विश्वनाथ कराड यांनी व्यक्त केला.

डॉ.श्रीपाल सबनीस म्हणाले," संतत्वाची साथ सोडल्यामुळेच समाजाचे नैतिक अधःपतन झाले आहे; दांभिकता आणि अंधश्रद्धा बाजूला सारून सर्वांनी संतांच्या विचारांचा एकात्म महाराष्ट्र घडवावा. संत परंपरेतून विश्वशांतीचा ध्यास घेणारे प्रा.डॉ. विश्वनाथ कराड 'हे विश्वचि माझे घर' म्हणणाऱ्या संत ज्ञानेश्वरांचे खरे पाईक आहेत. प्रा. स्वाती कराड - चाटे म्हणाल्या," मराठी भाषेचे संवर्धन करणे, पुढच्या पिढीला तिची ओळख करून देणे ही शिक्षण संस्थांची जबाबदारी आहे. चांगल्या साहित्यातूनच समाज समृद्ध होतो. म्हणून मुलांमध्ये संत साहित्याचा विचार रुजवावा. नांदी संमेलनाच्या निमित्ताने ज्ञानेश्वर माउलींच्या पावन भूमीत 'तीर्थक्षेत्राकडून ज्ञानतीर्थक्षेत्राकडे' होणारी ही वाटचाल मराठी भाषेला अधिक बळकटी देईल. डॉ.अतुल कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ.महेश थोरवे यांनी आभार मानले.

'सुरक्षित बचपन अभियानांतर्गत' कायदेविषयक मार्गदर्शन

बालकांचे हक्क, कायदे , सायबर सुरक्षेबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन तालुका विधी सेवा समिती, सासवड यांचा उपक्रम

■ जेजुरी (दै. संध्या)



श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे येथे तालुका विधी सेवा समिती, सासवड यांच्या वतीने 'सुरक्षित बचपन अभियान' अंतर्गत मोफत कायदेविषयक मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन गुरुवार, दिनांक २९ ऑक्टोबर रोजी करण्यात आले. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना बालकांचे हक्क, कायदेविषयक तरतुदी, नागरिकांचे अधिकार आणि सायबर सुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव ,राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. या कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून ॲड. विश्वास पानसे, ॲड. सुभाष नाझीरकर, ॲड. गणेश लेंडे आणि वर्षा सुतार (कोर्ट स्टाफ) यांनी कायदेविषयक माहिती दिली. विद्यार्थ्यांना कायद्याची ओळख करून देण्याबरोबरच समाजात कायदेविषयक जनजागृती निर्माण करणे आणि नागरिकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमात 'मेरा बचपन, मेरा अधिकार', 'कानून जाणो, बचपन बचाओ' आणि 'सुरक्षित क्लिक, सुरक्षित बचपन' या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. बालकांच्या संरक्षणासाठी असलेल्या कायद्यांची माहिती, बालकांचे मूलभूत हक्क, अन्यायाविरुद्ध दाद मागण्याचे मार्ग आणि कायद्याचे महत्त्व याविषयी विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

आजच्या डिजिटल युगात इंटरनेट आणि सोशल मीडियाचा वापर करताना विद्यार्थ्यांनी कोणती काळजी घ्यावी, अनोळखी व्यक्तींशी ऑनलाइन संवाद साधताना कोणती खबरदारी बाळगावी, वैयक्तिक माहिती आणि छायाचित्रे सुरक्षित कशी ठेवावीत, तसेच सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. तालुका विधी सेवा समिती, सासवड यांच्या पुढाकारातून आयोजित या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली. तसेच बालकांचे संरक्षण, सुरक्षित बालपण आणि सायबर सुरक्षेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही या मार्गदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर चव्हाण यांनी केले, तर सोनबा दुर्गाडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे नियोजन विद्यालयाचे पर्यवेक्षक बाळासाहेब जगताप,सोमनाथ उबाळे, ज्युनिअर विभागप्रमुख किरण मोडक, माध्यमिक विभागप्रमुख प्रल्हाद गिरमे यांनी केले.

कायदेविषयक साक्षरतेसाठी महत्त्वपूर्ण उपक्रम

कायद्याविषयी पुरेशी माहिती नसल्यामुळे अनेकदा नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने आपले हक्क आणि कर्तव्ये जाणून घेणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी लहान वयापासूनच कायद्याविषयी जागरूक राहावे, अन्यायाविरुद्ध आवाज उठवावा आणि सुरक्षिततेच्या नियमांचे पालन करावे, असे आवाहन या कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात आले.

यावेळी जयसिंग वसावे, पूनम बाठे, वैष्णवी पवार,सीमा राणे, पूजा शिंदे,सचिन निकुडे, संदीप भोंग, सुरेश शिंदे, सोनाली कोसे,अमोल राणे उपस्थित होते.विद्यार्थ्यांना सुरक्षित, सजग, कायद्याची जाण असलेले आणि जबाबदार नागरिक बनविण्याच्या दृष्टीने जिजामाता विद्यालयात आयोजित करण्यात आलेली ही कायदेविषयक मार्गदर्शन कार्यशाळा महत्त्वपूर्ण ठरली. शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, कायदेविषयक साक्षरता आणि सुरक्षिततेची भावना रुजविण्यासाठी असे उपक्रम उपयुक्त असल्याचे यावेळी अधोरेखित झाले.